दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com
● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३२ | शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

राजकीय नैतिकतेचे धिंडवडे चिंता वाढविणारे...!

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका प्रकरणाने मोठी खळबळ उडवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि कॅबिनेट मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात १९९५ च्या सदनिका घोटाळा प्रकरणात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली आहे.

थोडक्यात...

तपोवन वृक्ष तोडीवरून सरकारला नोटीस

नाशिक : नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आणखी २ वर्षांनी, २०२७ साली 'सिंहस्थ कुंभमेळा' होणार असून त्यासाठी साधूग्राम बनवण्यासाठी नाशिकच्या तपोवन येथील १८०० झाडांची कत्तल करण्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली असून वृक्षतोडीविरोधात दाखल करण्यात आलेल्या या याचिकेची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार, नाशिक महानगरपालिका आणि वृक्ष प्राधिकरणाला नोटीस बजावली असून त्यांना उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सरकारला मोठा दणका बसला आहे.

पाण्याची टाकी फुटून ३ ठार; ८ जखमी

नागपूर : बुटीबोरी एमआयडीसी फेस २ येथील अवाडा सोलर प्लांटमध्ये आज सकाळच्या सुमारास भीषण दुर्घटना घडली. प्लांट परिसरातील पाण्याची मोठी टाकी अचानक फुटल्याने झालेल्या या अपघातात ३ कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून ८ कामगार गंभीर जखमी झाले आहेत. जखमींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्या. बचावकार्य युद्धपातळीवर राबवण्यात आले. मृत कामगारांचे मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

शिंदेंची ८४ ची मागणी भाजपने धुडकावली

मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि भाजप यांच्यातील जागावाटपासाठी शुक्रवारी मुंबईत बैठक पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने २०१७ साली जिंकलेल्या ८४ जागांवर आपला दावा सांगितला. मात्र, भाजपने शिंदेसेनेची ही मागणी सपशेल धुडकावून लावली. भाजपने २०१७ मध्ये शिवसेनेने जिंकलेल्या ८४ जागा यंदाही शिंदे गटाला सोडण्यास स्पष्ट नकार दिला आहे.जागावाटपाच्या पहिल्या बैठकीत शिवसेनेने शिंदे गटाला मुंबईत फक्त ५२ जागा देऊ केल्याची चर्चा होती. मात्र, कालच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेनंतर दोन्ही पक्षांनी ही बाब नाकारली होती.

शिंदेंचे नाव जाणीवपूर्वक गोवल्या जातेय

मुंबई : साता–यातील महाबळेश्वर परिसरात असणा–या सावरी गावात काही दिवसांपूर्वी १४५ कोटींचा ड्रग्जचा साठा सापडला होता. ड्रग्ज सापडलेली जागा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांच्या मालकीची असल्याचा आरोप ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला होता. त्यामुळे राज्यभरात खळबळ माजली होती. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांची पाठराखण केली. याप्रकरणात विरोधक एकनाथ शिंदे यांचे नाव जाणीवपूर्वक गोवत असल्याची टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

आता सोनेरी खिडकीतून साईबाबांचे मुखदर्शन

शिर्डी : आंतरराष्ट्रीय ख्याती असलेले शिर्डी येथील साईबाबांचे मंदिर आता सुवर्ण मंदिर म्हणून जगाच्या नकाशावर झळकू लागले आहे. दुबई येथे स्थायिक झालेल्या एका साईभक्तानं मंदिराच्या खिडकीला अर्थात ज्या खिडकीतून साईबाबांचे मुख दर्शन होते, त्याठिकाणी असलेल्या खिडकीला आकर्षक अशी सोन्याचा मुलामा असलेली फ्रेम बनवून त्यावर 'श्रद्धा सबुरी' ही सुवर्णअक्षरे देणगी स्वरूपात दिली आहे. त्यामुळे यापुढे सोन्याच्या खिडकीतून श्री साईबाबांचे मुखदर्शन भाविकांना घडणार आहे. भाविकांनी दिलेल्या दानातून साईबाबांच्या मंदिरात प्रत्येक वस्तू सोन्याची झाली आहे.

बेशिस्त पुणेकरांसाठी विदेशी लोक रस्त्यावर

पुणे : पिंपरी–चिंचवडमध्ये विदेशी नागरिकांनी फुटपाथवरून दुचाकी चालवणाऱ्यांना थांबवत वाहतूक नियम पाळण्याचं आवाहन केलं आहे. हा व्हिडीओ सध्या व्हायरल होत असून देशभरातील नेटकरी या विदेशी लोकांचं कौतुक करत आहेत. नियम तोडण्यात भारतीयांचा हात कोणीही धरू शकत नाही. लोक थेट फुटपाथवरून गाड्या चालवतात. पण त्यामुळे पादचाऱ्यांना मोठा त्रास होतो.मात्र या नियमभंग करणाऱ्या लोकांना सुजाण करण्यासाठी आता परदेशी नागरिक स्वतः रस्त्यावर उतरले आहेत. परदेशी लोक पादचारी मार्गावरून दुचाकी चालवणाऱ्यांना थांबवत आहेत आणि त्यांना नियम पाळण्यास सांगत आहेत.

देशात भाताचे दोन सुधारित वाण विकसित !

आयसीआरने २४ पिकात जनुकीय संपादित केल्याची लोकसभेत माहिती

नवी दिल्ली । वृतसंस्था

देशातील शेती अधिक उत्पादनक्षम, पोषणदृष्ट्या समृद्ध आणि हवामान बदलाला तोंड देणारी करण्यासाठी भारतीय कृषी संशोधन परिषदकडून जीनोम एडिटिंग अर्थात जनुकीय संपादन तंत्रज्ञानाचा वापर सुरू आहे. सध्या जनुकीय संपादनासाठी २४ क्षेत्रीय पिके आणि १७ फलोत्पादन पिकांमध्ये संशोधन करण्यात येत आहे,'' अशी माहिती केंद्र सरकारने लोकसभेत दिली. केंद्रीय कृषी राज्यमंत्री भगिरथ चौधरी यांनी लेखी उत्तरात सांगितले की, ''आयसीएआर व्यतिरिक्त जैवतंत्रज्ञान विभाग आणि वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद देखील १० पिकांमध्ये जनुकीय संपादनावर संशोधन करत आहेत,'' असे स्पष्ट केले.

किरणोत्सर्ग तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधी प्रश्नाला उत्तर देताना मंत्री चौधरी यांनी सांगितले की, ''गेल्या पाच वर्षांत २३ नवीन पिकांचे वाण विकसित करून लागवडीसाठी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. यामध्ये भात, मोहरी, उडीद, ज्वारी, भुईमूग, मूग, तीळ आणि केळी या पिकांचा समावेश आहे. आतापर्यंत एकूण ७२ सुधारित वाण किरणोत्सर्ग तंत्राद्वारे विकसित करण्यात आल्या असून, त्या देशातील विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या हंगामांमध्ये लागवडीसाठी उपयुक्त ठरत आहेत'', असा दावाही उत्तरात केला आहे. या जातींमध्ये उत्पादनवाढ ▶▶ पान २ वर

"रांची येथे स्वतंत्र जीनोम एडिटिंग केंद्र...

जीनोम एडिटिंग संशोधनाला गती देण्यासाठी आयसीएआर अंतर्गत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल बायोटेक्नॉलॉजीचे रांची येथे विशेष केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रासाठी २३.८९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला असून सोयाबीन, भुईमूग, सूर्यफूल, उडीद आणि कापूस या पिकांवर संशोधन सुरू आहे. तसेच आयसीएआरच्या विविध संस्थांमधून विकसित होणाऱ्या नवीन जाती देशातील वेगवेगळ्या कृषी–हवामान क्षेत्रांमध्ये लागवडीसाठी उपलब्ध करून दिल्या जातात, असेही चौधरी यांनी स्पष्ट केले.

कोकाटेंच्या अटकेला स्थगिती मात्र आमदारकीला धोका कायम

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादीचे नेते माणिकराव कोकाटे यांना उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. माणिकराव कोकाटेंच्या अटकेला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. तसेच या याचिकेवरील सुनावणी पूर्ण होईपर्यंत एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. माणिकराव कोकाटेंना फक्त दोन वर्षांची शिक्षा असल्याने त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आल्याचं कोर्टाने म्हटलं आहे. पण

नाशिक सत्र न्यायालयाच्या निकालाला ही स्थगिती नाही, त्यामुळे त्यांच्या आमदारकीला धोका कायम असल्याचं सांगण्यात येत.

राष्ट्रवादीचे नेते माणिकराव कोकाटे यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयात युक्तिवाद सुरू आहे. सत्र न्यायालयाने कोकाटेंना दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यानंतर त्याच्या विरोधात माणिकराव कोकाटे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. सत्र न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला स्थगितीची याचिकेत मागणी करण्यात आली आहे.बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय ▶▶ पान २ वर

निवडणुकीनंतर अजित पवारांशी युती नाही–बावनकुळे

पुणे । प्रतिनिधी

पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी परस्पर विरोधी लढणार आहेत. भाजपने आजवर केलेल्या कामाच्या जोरावर दोन्ही महापालिकांमध्ये भाजपची पुन्हा सत्ता येणार आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर या दोन महापालिकांमध्ये अजित पवार यांची साथ घेण्याची किंवा त्यांच्याशी युती करण्याची वेळ येणार नाही, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पुणे प्रेस क्लबसाठी राज्य सरकारने जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल पुणे पत्रकार प्रतिष्ठान आणि पुणे श्रमिक पत्रकार संघ यांच्या वतीने गुरुवारी कृतज्ञता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बावनकुळे बोलत होते. यावेळी चेतनानंद गावडे महाराज, पुणे पत्रकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष शैलेश काळे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे

अध्यक्ष ब्रीजमोहन पाटील, पांडूरंग सांडभोर, मंगेश फल्ले, उमेश शेळके, सुनित भावे, अंजली खमितकर आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. राज्यातील महापालिकांची निवडणूक भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना युतीच्या माध्यमातून लढणार आहे. या युतीपासून अजित पवार यांना दूर ठेवण्यात आल्याने पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत अजित पवारांची राष्ट्रवादी शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत आघाडी करणार असल्याची चर्चा सुरू आहे. बावनकुळे म्हणाले, कोणाशी आघाडी करायची हा अजित पवार व त्यांच्या पक्षाचा ▶▶ पान २ वर

महसूलमंत्री बावनकुळेंवर नामुष्की निलंबनाची घोषणा मागे

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

आरेरावीची एकेरी भाषा आणि नाहक केलेले निलंबन यामुळे महसूल कर्मचा–यांमध्ये निर्माण झालेला असंतोष दूर करण्यात बावनकुळे यांनी पुढाकार घेतला. पालघर आणि मावळमधील प्रकरणात विधिमंडळात जाहीर केलेले निलंबन मागे घेण्यात येतील असे आश्वासन देत महसूल कर्मचारी संघटनेसमोर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माघार घेतली. त्यामुळे महसूल महासंघाकडून पुकारण्यात आलेले कामबंद आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जीवन आहेर आणि महाराष्ट्र राज्य तलाठी पटवारी, मंडळाधिकारी समन्वय महासंघाचे अध्यक्ष विजय टेकाळे यांनी आंदोलन तुर्त स्थगित करण्यात आल्याचे कळविले आहे. मावळ प्रकरणातील सर्व अधिकारी व कर्मचा–यांचे निलंबन तीन दिवसात मागे घेतले जाईल त्यासाठी विभागीय आयुक्तांचा अहवाल मागविला जाणार आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये जिल्हास्तरील झालेल्या गौण खनिज विषयक सर्व कारवाया मागे घेतल्या जातील, असे आश्वासन मंत्री बावनकुळे यांनी दिले आहे. तसेच पालघरमधील कर्मचा–यांचे निलंबन मागे घेण्यात येतील, असेही आश्वासित करण्यात आले. नायब तहसीलदार, सहाय्यक महसूल अधिकारी, महसूल ▶▶ पान २ वर

संतोष देशमुख हत्या प्रकरणात नवा ट्विस्ट

सरकारी वकील उज्वल निकम यानां केस मधून बाजूला करण्याची मागणी

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या सुनावणीत सहकारी सरकारी वकील बाळासाहेब कोल्हेंकडून या सुनावणीवेळी युक्तिवाद केला सुनावणीसाठी धनंजय देशमुख उपस्थित आहेत. आरोपींवर आज चार्ज फ्रेम होण्याची शक्यता आहे. तर या प्रकरणातील आरोपी ज्ञानेश्वर उर्फ सुदर्शन घुले वैद्यकीय कारणास्तव तूर्तास गैरहजर असल्याची माहिती आहे. वाल्मीक कराड इतर आरोपी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर होते .वाल्मीक कराड आणि विष्णु चाटे वगळता इतर आरोपींनी सरकारी वकील उज्वल निकम हे राजकीय पक्षाशी संबंधित असल्याने त्यांना यातून बाजूला करावे असा अर्ज न्यायालयाला दिला त्यामुळे आरोप निश्चितीसाठी पुढील तारीख २३ डिसेंबर देण्यात आली.

सकाळी ११ वाजता बीड न्यायालयात सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुनावणीला सुरुवात झाली आहे.सरकारी पक्षाचे सहकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी सुरूवातीला युक्तिवाद केला. त्यानंतर वाल्मीक कराड आणि विष्णु चाटे वगळता इतर आरोपींनी ▶▶ पान २ वर

पुकार होताच आरोपीला चक्कर

न्यायाधीशांनी आरोपी घुलेचे नाव पुकारताच आरोपी सुदर्शन घुले चक्कर येऊन खाली पडला. घटनेदरम्यानचे व्हिडिओ आरोपी वकिलांना देण्यात यावे मग आरोप निश्चिती केली जावी असा युक्तिवाद आरोपींच्या वकिलांनी केला आहे.

थेट परदेशी गुंतवणूकीसाठी 'इनव्हेस्ट महाराष्ट्र' संस्थेची स्थापना

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात अधिकाधिक थेट परदेशी गुंतवणूक आणण्यासाठी 'इनव्हेस्ट महाराष्ट्र' या नव्या संस्थेची स्थापना करण्यात आली असून संस्थेला ३ हजार कोटींचे भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच नव्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरणाच्या माध्यमातून येत्या पाच वर्षात राज्याची अर्थव्यवस्था १ लाख कोटी डॉलर्सची करतानाच २७ लाख कोटींची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगार निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे. त्यासाठी उद्योगांना १ लाख ६१ हजार कोटींचे प्रोत्साहन अर्थसा देण्यात येणार आहे.

एक लाख कोटी डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे आकारमान होणारे महाराष्ट्र हे ▶▶ पान २ वर

तीन सख्खे भाऊ एमपीएससी उत्तीर्ण, एकाच गावातील १५ अधिकारी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या जिद्दीला सलाम करणारी एक हृदयस्पर्शी यशोगाथा अहिल्यानगर जिल्ह्यातून समोर आली आहे. श्रीगोंदा तालुक्यातील उखलगाव येथील चंदन कुटुंबातील तीन सख्ख्या भावांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण करत प्रशासकीय सेवेत स्थान मिळवले, जे महाराष्ट्रातील दुर्मिळ उदाहरण मानले जात आहे. दुर्गम गावातून थेट अधिकारीपदापर्यंतचा प्रवास अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, दुर्गम भागात ▶▶ पान २ वर

लोकसभेनंतर राज्यात नव्या राजकीय पक्षांचं पीक

मुंबई । प्रतिनिधी

निवडणुकांच्या रणधुमाळीत राजकीय पक्षांनीही कंबर कसली आहे. लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची वेळ असल्याने बऱ्याच राजकीय पक्षांच्या नोंदणीला सुरुवात झाल्याचे राज्य निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवरून दिसून येत आहे. मे २०२४ पासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत राज्यभरात एकूण ३५ नव्या पक्षांची नोंदणी झाली आहे. राज्य निवडणुक आयोगाकडे एकूण ४३५ राजकीय पक्षांची नोंदणी असून यातील १६८ पक्षांची, म्हणजेच जवळपास ३० टक्के पक्षांची नोंदणी ही गेल्या पाच वर्षांतील आहे.

लोकसभा निवडणूक झाल्यानंतर राज्यातील विधानसभा आणि त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागणार, हे स्पष्ट होते. लोकसभेच्या निवडणुका पार

पडल्यापासून विधानसभा निवडणुकीपर्यंतच्या अवघ्या सहा महिन्यांच्या काळात राज्यभरात ११ नव्या पक्षांची नोंदणी करण्यात आली. तर विधानसभा निवडणूक झाल्यापासून ते ७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत एकूण २५ पक्ष राज्यात उदयास आले आहेत. यातील बहुतांश पक्ष हे स्थानिक पातळीवरचे राजकारण करणार असून त्यांच्या नोंदणीचे पत्ते व्यक्तींच्या घराचे आहेत.तीन वर्षांपूर्वी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांमध्ये फूट पडल्याने दोन नव्या राज्यस्तरीय पक्षांची राजकारणात भर पडली. नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी १९३९ साली पश्चिम बंगालमध्ये स्थापन केलेल्या ऑल इंडिया फॉरवर्ड

लोकसभा निवडणुकीनंतर पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक पक्षांची नोंदणी झाली असून त्यापाठोपाठ मराठवाडा आणि विदर्भात राजकीय पक्ष नोंदविले गेले आहेत. मुंबईत तीन, तर ठाणे जिल्ह्यात दोन नव्या पक्षांची नोंदणी गेल्या दीड वर्षांत झाली आहे.

ब्लॉक पक्षाने जानेवारी २०२३मध्ये, तर तेलंगणातील के. चंद्रशेखर राव यांनी ▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू: २२.०० क्विंटल			
	२,३५०	२,९४१	२,६८२
ज्वारी/हायब्रिड: ३२.५० क्विंटल			
	२,३१०	३,८११	२,८९८
मका/लोकल: ७.०० क्विंटल			
	१,६२६	१,६२६	१,६२६
तूर : ४.०० क्विंटल			
	६,३५०	६,३५०	६,३५०
उडीद :२.०० क्विंटल			
	४,८००	४,८००	४,८००
बाजरी: ३९.५० क्विंटल			
	२,७१९	३,६८०	३,०८८
मुग: १.०० क्विंटल			
	६,१५०	६,१५०	६,१५०
सोयाबीन: १३२.५० क्विंटल			
	४,४५०	४,५११	४,४९०
हरभरा: १.०० क्विंटल			
	४,१००	६,००१	५,०५०

अग्रलेख

राजकीय नैतिकतेचे धिंडवडे चिंता वाढविणारे...!

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका प्रकरणाने मोठी खळबळ उडवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि कॅबिनेट मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात १९९५ च्या सदनिका घोटाळा प्रकरणात नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा कायम ठेवली आहे. त्यानंतर अटक वॉरंट जारी झाले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याकडील क्रीडा व युवक कल्याण तसेच अल्पसंख्याक विकास मंत्रालयाचे पदभार काढून घेतले. हे पदभार आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवण्यात आले आहेत. हे प्रकरण केवळ एका व्यक्तीच्या अपराधाचे नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचे आहे. या घटनेतून राजकारणातील नेत्यांनी कोणते धडे घ्यावेत, यावर विचार करणे गरजेचे आहे. प्रथम, हे प्रकरण राजकारणातील पारदर्शकता आणि नैतिकतेची कमतरता उघड करते. १९९५ मध्ये आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव असलेल्या सदनिकांसाठी बनावट कागदपत्रे सादर करून फसवणूक केल्याचा आरोप कोकाटे यांच्यावर होता. त्यांचे वडील साखर कारखान्याचे संचालक असताना स्वत:ला आर्थिकदृष्ट्या दुर्बल दाखवणे ही स्पष्टपणे फसवेगिरी आहे. न्यायालयाने शिक्षा कायम ठेवली आणि अटक वॉरंट जारी केले, आता कोकाटे यांनी राजीनामा दिला आहे. पण प्रश्न हा आहे की, अशा नेत्यांना राजकारणात इतकी वर्षे कसे टिकता येते? हे दर्शवते की, राजकीय पक्ष नेत्यांची पार्श्वभूमी तपासण्यात अपयशी ठरतात. धडा असा की, पक्षांनी उमेदवार निवडताना केवळ लोकप्रियता किंवा पक्षनिष्ठा नव्हे, तर नैतिक चारित्र्याची कसोटी लावली पाहिजे. अन्यथा, अशी प्रकरणे पक्षाची प्रतिमा डागाळतात आणि जनतेचा विश्वास उडतो.दुसरा महत्त्वाचा धडा म्हणजे कायद्यापुढे समानता. विरोधी पक्षाचे नेते, जसे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार पक्ष) चे आमदार रोहित पवार, यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. ते म्हणतात की, राहुल गांधी आणि सुनील केदार यांना शिक्षा झाल्यानंतर २४ तासांत त्यांचे संसद आणि विधानसभा सदस्यत्व रद्द झाले, मग कोकाटे यांना वेगळा न्याय का? विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी अद्याप कोकाटे यांची आमदारकी रद्द केलेली नाही. हे दुजाभाव दर्शवते. कायद्यानुसार, दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षेच्या प्रकरणात सदस्यत्व अपात्र ठरते. पण सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांसाठी नियम शिथिल केले जातात, हा राजकारणातील एक मोठा दोष आहे. धडा असा की, राजकारणींनी कायद्याचा आदर करावा आणि पक्षीय हितापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावे. अन्यथा, जनतेला वाटेल की राजकारण हे फक्त सत्तेसाठी आहे, न्यायासाठी नाही.तिसरा धडा म्हणजे जबाबदारी आणि उत्तरदायित्व. कोकाटे यांच्यावर यापूर्वीही अनेक आरोप झाले आहेत कृषिमंत्री असताना विधानसभेत रमी जुगार खेळल्यापासून ते विविध घोटाळ्यांपर्यंत. तरीही ते मंत्रिपदापर्यंत पोहोचले. हे दर्शवते की, राजकीय व्यवस्था अपराधी नेत्यांना संरक्षण देते. महाराष्ट्रात महायुती सरकार आहे, ज्यात भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) आहेत. विरोधक म्हणतात की, सरकार कोकाटे यांना वाचवत आहे. हे खरे असो वा नसो, पण अशी प्रकरणे राजकारणातील भ्रष्टाचाराला खतपाणी घालतात. धडा असा की, नेत्यांनी स्वत:च्या कृत्यांची जबाबदारी घ्यावी. राजीनामा देणे हे केवळ दबावामुळे नव्हे, तर नैतिकतेच्या आधारावर असावे. तसेच, पक्षांनी अशा नेत्यांना तात्काळ बाजूला करावे, जेणेकरून पक्षाची प्रतिमा वाचेल.चौथा धडा म्हणजे जनतेच्या विश्वासाचे महत्त्व. हे प्रकरण १९९५ चे असले तरी आजही प्रासंगिक आहे, कारण सदनिका घोटाळा हा गरीबांसाठी राखीव असलेल्या सुविधांचा दुरुपयोग आहे. कोकाटे यांनी सदनिका मिळवून त्यावर अतिक्रमण केले, अगदी मिल्क एटीएम सुरू केले. हे दर्शवते की, राजकारणी स्वत:च्या फायद्यासाठी जनतेच्या हक्कांचा दुरुपयोग करतात. परिणामी, जनतेचा राजकारणावरचा विश्वास उडतो. मतदार म्हणून जनतेने अशा नेत्यांना निवडताना सावध राहावे, पण नेत्यांनीही जनतेच्या अपेक्षा पूर्ण कराव्यात. राजकारण नैतिकतेचे असावे. वैयक्तिक लाभासाठी नाही. नेत्यांनी पारदर्शक जीवन जगावे, जेणेकरून जनता त्यांच्यावर विश्वास ठेवेल.पाचवा धडा म्हणजे न्यायव्यवस्थेची भूमिका आणि राजकीय हस्तक्षेप टाळणे. न्यायालयाने कोकाटे यांच्या शिक्षेला कायम ठेवले आणि अटक वॉरंट जारी केले. युक्तिवादात त्यांच्या वकिलांनी सहानुभूतीची विनंती केली, पण न्यायालयाने दिलासा दिला नाही. हे चांगले आहे, कारण न्यायव्यवस्था स्वतंत्र राहिली पाहिजे. पण राजकारणात अनेकदा न्यायालयाच्या निर्णयांना राजकीय रंग दिला जातो. धडा असा की, नेत्यांनी न्यायव्यवस्थेचा आदर करावा आणि त्यात हस्तक्षेप टाळावा. अन्यथा, लोकशाही कमकुवत होते.शेवटी, हे प्रकरण राजकारणातील सुधारणांची गरज अधोरेखित करते. भारतात राजकीय पक्षांवर कायद्याने बंधने नाहीत, पण नैतिक बंधने असावीत. पक्षांनी स्वत: आचारसंहिता लागू करावी, ज्यात अपराधी नेत्यांना रोखले जाईल. तसेच, निवडणूक आयोगाने अपात्रतेचे नियम कठोरपणे अंमलात आणावेत. कोकाटे प्रकरण हे एक उदाहरण आहे, पण अशी अनेक प्रकरणे आहेत. राजकारण्यांनी धडा घ्यावा की, सत्ता क्षणिक आहे, पण प्रतिमा कायम राहते. नैतिकतेशिवाय राजकारण हा केवळ खेळ आहे, ज्यात जनता हरते. हे प्रकरण महाराष्ट्राच्या राजकारणाला एक आरसा दाखवते. जर नेत्यांनी हे धडे घेतले नाहीत, तर जनता त्यांना मतपेटीतून धडा शिकवेल. राजकारण स्वच्छ आणि जबाबदार असावे, हाच या प्रकरणाचा मुख्य संदेश आहे.

शेट्टींकडून साखर कारखान्यांना १३ जानेवारीचा अल्टिमेटम!

पुणे । प्रतिनिधी

अनेक कारखान्यांकडे प्रलंबित असलेली २ हजार कोटी रुपयांची रक्कम १५ टक्के व्याजासहित शेतकऱ्यांना द्यावी, असे स्पष्ट न्यायालयीन आदेश असतानाही या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात गेलेल्या साखर कारखानदारांविरोधात १३ जानेवारीच्या सुनावणीनंतर मोर्चा काढण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक व माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिला आहे. या साखर कारखानदारांना सरकारची साथ असल्याचा आरोपही त्यांनी या वेळी केला.

साखर कारखान्यांनी थकविलेल्या एफआरपी (रास्त व किफायतशीर किंमत)प्रश्नी श्री. शेट्टी यांनी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची गुरुवारी (ता. १८) भेट घेऊन चर्चा केली. यानंतर शेट्टी यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. साखर कारखानदारांवर टीका करताना ते म्हणाले, की साखर कारखानदारांनी एफआरपीचे तुकडे तुकडे करून शेतकऱ्यांना पैसे देण्याचे धोरण अवलंबले आहे. तर अनेक कारखान्यांनी शेतकऱ्यांची देणी थकवली आहेत. याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने आदेश देऊनसुद्धा साखर कारखानदार शेतकऱ्याची सुमारे २ हजार कोटींची उसाची देणी देऊ इच्छित नाहीत. मुंबई उच्च न्यायालयाच्या यासंदर्भातील निकालाविरोधात कारखानदार सर्वोच्च न्यायालयात गेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने देखील मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश कायम ठेवले आहेत. तरीही न्यायालयीन आदेशांना न जुमानता आपलाच हेका पुढे चालविणाऱ्या साखर कारखान्यांविरोधात साखर आयुक्तालयावर मोर्चा काढण्यात येईल. याप्रश्नी सरकारही कारखानदारांचीच तळी उचलत असल्याचे सांगत शेट्टी म्हणाले, की याप्रकरणी आतापर्यंत ९ सुनावण्या झाल्या आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालयानेही मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे १३ जानेवारीच्या सुनावणीनंतर आम्ही शांत बसणार नाही. सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या कारखान्यानेदेखील एफआरपी थकित ठेवली आहे. त्याच्यावरदेखील कारवाई करण्याचे धाडस साखर आयुक्तांनी दाखवावे. माणिकराव कोकाटेंप्रमाणेच सहकार मंत्र्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणीही शेट्टी यांनी केली.

पालवन चौकात वेश्या व्यवसायावर छापा

बीड । प्रतिनिधी

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई, पिडीत महिलेची सुटका, वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या दोघांवर पोस्टे शिवाजी नगर मधे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनैतिक वाहतूक प्रतिबंध कक्ष बीडच्या पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव यांना दिनांक १९/१२/२०२५ रोजी दुपारी गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की , पोलीस ठाणे शिवाजीनगर हद्दीत पालवण रोड ला, पालवण चौक जवळ, एक महिला एका पुरुषाच्या मदतीने आपल्या राहत्या घरामध्ये महिलांना बाहेरुन बोलावून, वेश्या व्यवसाय करीत आहेत. सदर माहिती वरिष्ठांना देण्यात आली. त्यावरून वरिष्ठांनी पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे यांना सदर ठिकाणी छापा टाकण्याचे लेखी आदेश दिले. त्यावरून कस्तुरे व अ. मा. वा. प्र. कक्षाच्या प्रमुख पल्लवी जाधव या त्यांच्या संपूर्ण स्टाफसह तसेच डमी ग्राहक व पंचासह सापळापूर्व पंचनामा करून सदर ठिकाणी गेले. डमी ग्राहकास सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता तेथे असलेल्या पुरुष एजंटने वेश्या गमनासाठी होकार देवून त्यासाठी १००० रुपयांची मागणी केली व डमी ग्राहकास वरच्या मजल्याच्या रूम मधे जायला सांगितले. डमी ग्राहकाने ठरल्या प्रमाणे रक्कम देवून पोलीस पथकास ठरलेला इशारा केला असता, पोलीस पथकाने सदर ठिकाणी जावून छापा मारला. पैसे स्वीकारलेल्या पुरुषास त्याचे नाव गाव विचारले असता, त्याने त्याचे नाव अशोक ज्ञानोबा गदळे वय ६१ वर्षे रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड असे सांगितले. सदर पुरुषाची झडती घेतली असता डमी ग्राहकाने दिलेल्या नमूद वर्णनाच्या ५०० रू. दराच्या २ नोटा मिळून आल्याने त्या पंचासमक्ष जप्त केल्या. सदर ठिकाणी एक पीडित महिला मिळून आली. पीडीत महिलेला विश्वासात घेवून चौकशी केली असता , तिने सांगितले की, अशोक ज्ञानोबा गदळे आणि आशा सुंदर पवार वय ४५ वर्षे रा. पालवण रोड पालवण चौक जवळ जि. बीड हे दोघे महिलांना घरी बोलवून घेतात व स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ग्राहकाकडून पैसे घेवून, पीडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याचे सांगितले. आरोपी अशोक गदळेची दोन पंचा समक्ष झडती घेतली असता, त्याच्याकडे डमी ग्राहकाने दिलेल्या २ नोटा मिळून आल्या. तसेच रुमची झडती घेतली असता १२ विना वापरलेले निरोध मिळून आले आहे. दोन्ही नमुद आरोपींवर पीडीत महिलेस स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बोलावून घेऊन, स्वतःच्या ताब्यातील जागेचा वापर करुन त्याच कमाईवर उदरनिर्वाह करुन वेश्याव्यवसाय करण्यास लावले व सदर महिलेचे शोषण करण्याच्या उद्देशाने बोलावले म्हणून त्यांच्या विरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ कलम ३,४,५,६ व कलम ३(५) भा. न्या. संहिता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तसेच पीडित महिलेची सुटका करण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उमाशंकर कस्तुरे प्रभारी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय , पोलीस उप निरीक्षक पल्लवी जाधव , महिला फौजदार मीरा रेडेकर, महीला पोलीस हवालदार उषा चौरे, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई योगेश निर्धार सर्व नेमणूक अ. मा. वा. प्र. कक्ष यांनी केली.

संगीत श्री गुरुचरित्र पारायणाची सांगता; आज सामूहिक श्रीसूक्त हवन

बीड । प्रतिनिधी

बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या उपस्थितीत दिनांक १६ ते २० डिसेंबर या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून गुरुवारी बाळू महाराज नाव्हेकर यांच्या संगीतमय गुरुचरित्र कथेची सांगता झाली यावेळी शेकडो भाविकांची उपस्थिती होती.

शहरातील सुभाष रोडवरील अमृत मंगल कार्यालय येथे बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या पावन उपस्थितीत दिनांक १६ ते २० डिसेंबर या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने गुरुवारी बाळू महाराज नाव्हेकर यांच्या सुमधुर वाणीतून सादर झालेल्या संगीतमय श्री गुरुचरित्र कथेची सांगता मोठ्या भक्तिभावात झाली. या वेळी शेकडो भाविकांनी उपस्थित राहून कथारसाचा आनंद घेतला.कार्यक्रमस्थळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून उपस्थित भाविकांनी गुरुचरित्राच्या संगीतमय कथेमुळे अध्यात्मिक अनुभूती घेतल्याची भावना व्यक्त केली. या धार्मिक उपक्रमांतर्गत बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलूकर यांच्या उपस्थितीत विविध धार्मिक विधी व कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.आज शुक्रवारी सामूहिक श्रीसूक्त हवन तसेच दर्शेष्टि यज्ञ होणार असून दि. २० रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व कार्यक्रमासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन यज्ञ सेवा समिती बीडच्या वतीने करण्यात आले आहे. संगीतमय गुरुचरित्र कथाच्या वेळेस अग्निसोम सेवा प्रतिष्ठान मार्फत प्रकाशित करण्यात आलेले दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले आहे.

ना.पंकजा मुंडे यांची नांदेड महापालिका निवडणुकीच्या प्रभारीपदी नियुक्ती

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांची नांदेड महापालिका निवडणुकीच्या प्रभारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आज एका पत्राद्वारे ही नियुक्ती केली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ नांदेड महानगरपालिका निवडणुकीकरिता आपली नियुक्ती करण्यात आल्याचे आज घोषित करण्यात आले. आपण आपल्या संघटन कौशल्याने भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्याकरिता सर्वांना सोबत घेऊन अथक परिश्रम कराल, असा मला पूर्ण विश्वास आहे असं पत्रात नमूद करून प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रश्नमंजुषा स्पर्धेतून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल –रणवीर पंडित

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत शारदा ज्ञानोत्सवातून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून या स्पर्धा अधिक रोमांचक करण्याचा आमचा प्रयत्न आहे, या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळा अंतर्गत शारदा ज्ञानोत्सवातील प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

प्रश्नमंजुषा स्पर्धेत जयभवानी विद्यालय गढी प्रथम, शिवशारदा पब्लिक स्कूल द्वितीय तर शारदा विद्यामंदिर गेवराईने तृतीय क्रमांक पटकावला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरित करण्यात आली. शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित शारदा ज्ञानोस्तव अंतर्गत शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर रोजी गेवराई येथील र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उद्घाटन रणवीर अमरसिंह पंडित याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्या डॉ रजनीताई शिखरे, डॉ. प्रशांत मुदकोंडवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे सोशल मिडियाचे तालुकाध्यक्ष संदीप मडके, बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी पवार,अक्षय पवार, समाधान मस्के, प्रसाद उदे, शरद कबले यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

पान १ वरून...

देशात भाताचे दोन सुधारित

, लवकर पक्वता, दाण्याचा आकार मोठा, पोषणमूल्य सुधारणा, रोगप्रतिकारक क्षमता आणि दुष्काळ व अन्य ताण सहन करण्याची क्षमता यांसारखी वैशिष्ट्ये आढळून येत असल्याचे सांगितले आहे. जनुकीय संपादनाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या संशोधनाची माहिती देताना चौधरी यांनी सांगितले की, ''आयसीएआरने भाताच्या दोन जनुकीय संपादित वाण यशस्वीपणे विकसित केले आहेत. तसेच नवी दिल्ली येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ प्लांट जीनोम रिसर्च बायोटेक्नॉलॉजी रिसर्च अँड इनोव्हेशन कौन्सिल यांनी कमी ग्लुकोसिनोलेट असलेली मोहरीची जनुकीय संपादित श्रेणी विकसित केली आहे. हे वाण सध्या आयसीएआरच्या अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्पांतर्गत क्षेत्र चाचण्यांच्या टप्प्यात आहे.'' असे ते म्हणाले.

निवडणुकीनंतर अजित

व्यक्तिगत प्रश्न आहे. हा प्रयोग स्थानिक आहे. त्यामुळे या प्रयोगाचा राज्यातील सत्तेवर कसलाही परिणाम होणार नाही. आम्ही आणि अजित पवार आमने सामने लढलो तरी आमच्यात कटुता येणार नाही, याची आम्ही काळजी घेऊ. भाजपने शहरात केलेल्या कामाच्या बळावर दोन्ही महापालिकांमध्ये भाजप शिवसेना युतीला यश मिळेल. त्यामुळे निवडणुकीनंतर पुण्यात अजित पवारांची साथ घेण्याची वेळच आमच्यावर येणार नाही. काही पक्ष प्रवेशांना स्थानिक आमदारांचा विरोध असेल, तर त्यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल. शेवटी संसदीय राजकारणात आकड्यांना महत्त्व असते. अपेक्षित आकडा गाठण्यासाठी काही पक्षप्रवेश करावे लागतील, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

कोकाटेंच्या अटकेला स्थगिती

सदनिकांचा लाभ घेतल्याप्रकरणी माणिकराव कोकाटे यांना सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावणी आहे. याप्रकरणी सत्र न्यायालयाच्या निकालाविरोधात माणिकराव कोकाटेंनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर न्या. आर एन लढ्ढा यांच्या एकलपीठासमोर सुनावणी पार पडली.बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकांचा लाभ घेतल्याप्रकरणी अडचणीत आलेले माणिकराव कोकाटे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. असं असलं तरी अद्याप त्यांच्या अडचणी कमी झालेल्या नाहीत. एकीकडे त्यांना अटकेची भीती असताना दुसरीकडे त्यांची आमदारकी देखील धोक्यात आहे. माणिकराव कोकाटे यांनी दाखल केलेल्या याचिकांना सरकारी वकिलांनी विरोध केला आहे. हे अपवादात्मक प्रकरण नाही, ते एक मंत्री आहे. राहुल गांधी आणि हे प्रकरण वेगळ आहे. राहुल गांधींचे प्रकरण हे मानहाणीचं प्रकरण होतं, तर माणिकराव कोकाटेंचे प्रकरण वेगळं असल्याचा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. दुर्बल घटकांसाठी असलेल्या घरांचे हे प्रकरण असून कोकाटेंनी दुर्बलांच्या हक्काचं घर लाटल्याचा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. केवळ लोकप्रतिनिधी असल्याने कोकाटेंना सूट देण्यास राज्य सरकारचा विरोध असल्याचं वकिलांनी सांगितलं.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात

सरकारी वकील उज्वल निकम हे राजकीय पक्षाशी संबंधित असल्याने त्यांना यातून बाजूला करावे असा अर्ज न्यायालयाला दिला तर आरोपी क्रमांक २ विष्णू चाटे यांच्या जामीन अर्जावर युक्तिवाद झाला आहे. विष्णू चाटे याचे सुरवातीच्या दोन एफआयआर ()मध्ये नाव नाही तसेच त्यांच्यावर या पूर्वी कोणताही गुन्हा दाखल नसल्याचा युक्तिवाद चाटेच्या वकिलांनी केला. विष्णु चाटेकडून वारंवार आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे खंडणीची मागणी करण्यात आली, असल्याचा युक्तीवाद सरकारी पक्षाच्या वकिलांनी केला आहे. विष्णु चाटे सुरूवातीपासून गुन्ह्यात सक्रिय आहे, असंही सरकारी पक्षाकडून सांगण्यात आलं आहे. सरकारी वकील उज्वल निकम यांच्याबाबत दिलेल्या अर्जाबाबत न्यायाधीशांनी निकम यांना कल्पना दिली. त्यानंतर निकम यांनी आपले म्हणणे न्यायालयासमोर मांडत हा अर्ज रिजेक्ट करण्याची मागणी केली आहे. न्यायाधीशांनी आरोपी घुलेचे नाव पुकारताच आरोपी सुदर्शन घुले चक्कर येऊन खाली पडला. घटनेदरम्यानचे व्हिडिओ आरोपी वकिलांना देण्यात यावे मग आरोप निश्चिती केली जावी असा युक्तिवाद आरोपींच्या वकिलांनी केला आहे. जे व्हिडीओ ट्रायल कोर्टात नाही ते व्हिडिओ उच्च न्यायालयात दाखवले जातात आणि वातावरण भावनिक केले जाते. सरकारी पक्षाकडून आजच आरोपीच्या वकिलांना व्हिडिओज फाइल दिले जाणार असल्याची माहिती आहे.अर्धा तास लॅपटॉप आणि पेन ड्राईव्हमधील व्हिडीओबाबत युक्तिवाद पार पडला. आवादा कंपनीचे अधिकारी यांनी मोबाईलमधून डेटा लॅपटॉपमध्ये कॉपी केला आणि मोबाईलमधील सर्व डेटा डिलिट केला असे म्हणणे तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयासमोर मांडले. अद्याप आरोप निश्चिती झालेली नाही.पुढील तारीख दिल्याने २३ रोजी काय होणार याकडे लक्ष लागून आहे.

महसूलमंत्री बावनकुळेंवर

सहाय्यक ग्राम महसूल अधिकारी, मंडल अधिकारी यांच्या वेतनश्रेणीत वाढ करण्यासाठीचा प्रस्ताव तसेच वेतन त्रुटी समितीने फेटाळल्या होत्या. त्याचा विशेष प्रस्ताव महसूल विभागाकडून मंत्रिमंडळ बैठकीत ठेवण्यात येईल असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे. महसूल कर्मचारी संघटनेबरोबर झालेल्या बैठकीत घाऊक निलंबने मागे घेण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

तीन सख्खे भाऊ एमपीएससी

राहूनही अजय चंदन यांनी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट-ब २०२४ परीक्षेत यश मिळवत राज्य कर निरीक्षक पदाला गवसणी घातली आहे. जिल्हा परिषद शाळेतून शिक्षण घेतलेल्या अजय यांचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.दोन भाऊ आधीच सेवेत; तिसऱ्याने पूर्ण केले स्वप्न चंदन कुटुंबातील मोठे भाऊ दिलीप मालन चंदन हे सध्या नागपूर गुन्हे शाखेत पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर दुसरे भाऊ विजय मालन चंदन हे पुणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. विशेष म्हणजे दोघेही सुरुवातीला शिक्षक होते, मात्रएमपीएससी परीक्षेच्या माध्यमातून मोठे ध्येय गाठण्याचा निर्धार त्यांनी केला आणि यश मिळवले. दिलीप चंदन अधिकारी झाल्यानंतर त्यांच्या प्रेरणेतून उखलगावमधील जवळपास १५ तरुणांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केल्याचे ग्रामस्थ सांगतात. केवळ स्वत:पुरते यश न ठेवता, गावातील इतर विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन आणि प्रेरणा देण्याचे कार्य हे तिघे सख्खे भाऊ करत आहेत. ग्रामीण भागातून आलेल्या या तीन सख्ख्या भावांची एमपीएससी यशोगाथा आज संपूर्ण महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

थेट परदेशी गुंतवणूकीसाठी 'इनव्हेस्ट

देशातील पहिले राज्य म्हणून विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. गुंतवणुकीसाठी एक विश्वासार्ह जागतिक हब बनविण्यासाठी, राज्याच्या विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डॉक्युमेंटशी सुसगत नवीन औद्योगिक धोरण आणण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार उद्योग विभागाने पुढील ३५ वर्षांतील(सन २०२५ ते २०६०) राज्याच्या सर्वांगिण प्रगतीचा आढावा घेत नवे उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण तयार केले आहे. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन दरम्यान मंत्रिमंडळाने या धोरणास मान्यता दिली असून लवकरच त्याची घोषणा केली जाणार असल्याचे समजते. या धोरणात सन २०४७ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था पाच लाख कोटी डॉलर्सची करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. या धोरणात प्रामुख्याने स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि उच्च मूल्य सेवा क्षेत्राचा विकास, मोठ्याप्रमाणावर रोजगार निर्मिती शाश्वत आणि आत्मनिर्भरतेला चालना, सर्वसमावेशक वाढ तसेच नवीन उपक्रमांना चालना देणारे सुलभ व्यावसायिक वातावरण निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

'मॅग्नेटीक महाराष्ट्र'चे आयोजन

राज्यात अधिकाधिक प्रमाणात थेट परदेशी गुंतवणूक आणण्यासाठी नव्याने 'इनव्हेस्ट महाराष्ट्र' या संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला असून या कंपनीस तीन हजार कोटींचे भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात आले आहे. या कंपनीच्या माध्यमातून दर दोन वर्षांनी मॅग्नेटीक महाराष्ट्र या जागतिक गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे.

लोकसभेनंतर राज्यात नव्या

स्थापन केलेल्या भारत राष्ट्र समिती या पक्षाने मार्च २०२३ मध्ये राज्यात प्रवेश करत नोंदणी केली आहे.राजकीय पक्षांच्या स्थापनेनंतर त्यांची नोंदणी राज्य निवडणूक आयोगाकडे करावी लागते. या पक्षांची विभागणी ही राष्ट्रीय पक्ष, महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय पक्ष, इतर राज्यांतील राज्यस्तरीय पक्ष आणि आयोगाकडील नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष अशा चार वर्गात केली जाते. सध्याच्या घडीला राज्यात पाच राष्ट्रीय पक्ष असून तितकेत राज्यस्तरीय पक्ष आहेत. इतर राज्यांतील राज्यस्तरीय पक्षांची संख्या एकूण नऊ आहे. अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांची संख्या मात्र तब्बल ४१६ इतकी आहे.

cmyk

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २० डिसेंबर २०२५ ३

थोडक्यात

माध्यमिक विद्यालय रामपूरी येथे अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

तलवाडा । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रामपुरी येथे दिनांक १८ डिसेंबर हा दिवस अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून साजरा करण्यात आला. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव /माहिती देण्यासाठी शाळेचे क्रियाशील मुख्याध्यापक अशोक तौर यांनी विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. अल्पसंख्यांक हक्क दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष तौर सर व प्रमुख पाहुणे कोकाटे सर हे होते.

संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकाच्या हक्काचा जाहीरनामा स्वीकृत करून प्रस्तुत केला त्यानुसार अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादीचे संवर्धन करता यावे तसेच याबाबतचे वैशिष्ट्येची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी. या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने सूचना दिल्या होत्या, त्यानुसार महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगामार्फत १८ डिसेंबर हा दिवस प्रतिवर्षी सर्व शाळां व महाविद्यालयामध्ये अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणून राबविण्यात यावा अशा सूचना महाराष्ट्र शासनाने दिल्या होत्या. त्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आज शाळेमध्ये मोठ्या उत्साहात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक वैराळ सर व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले सूत्रसंचलन जाधव सर व आभार काळे सर यांनी मानले.

६७ वर्षानंतर पहिल्यांदाच भरला आनंदी बाजार

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक शाळा स्थापना नंतर ६७ वर्षांनी प्रथम आनंदी बाजार भरवण्यात आला होता, या विषयी सविस्तर माहिती अशी की या उपक्रमात शाळेतील एकुण ८५ विद्यार्थ्यांनी आपल्या शेतीतील सर्व प्रकारचा भाजी पाला, कडधान्य,व खाद्यपदार्थ ,भेळ, वडापाव,भजे,ईडली साभंर या सह चहा, कॉफी या सह थंड पेय ये होते या शेती व आधारित भाजीपाल्यापेक्षा खाद्य पदार्थचा जास्त नफा झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले या बाजाराचा उद्देशीट्ट शिक्षण सोबत शिक्षण व व्यवहारी ज्ञान व्हावे हा होता या वेळीकेंद्र प्रमुख जावेद पठाण साहेब, मुख्यध्यापक चव्हाण सर ,व सर्व शिक्षक वृंद शाळा शिक्षण समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सहसदृश व माजी सरपंच मिठ्ठ घोडके, समाजसेवक परमेश्वर घोडके, अंकुश खोरदे,राजु पठाण, सतीश घोडके,मिठ्ठ पठाण, दिपक काळे,वाहेद पठाण, अंकुश घोडके, महेंद्र भादवे,भाजपा युवा धानोरा गण प्रमुख ज्ञानेश्वर घोडके,भैय्या पठाण उपस्थित होते मुलांना मध्ये उत्साह होता. ग्रामस्थ उपस्थित सह यावेळी आमचे प्रतिनिधी प्रेम पवळ उपस्थित होते.

तांदळा, शिंगारवाडी, शेकटा परिसरात बिबट्यांचे दर्शन!

शेतकऱ्यात भितीचे वातावरण, वनविभागाचे दुर्लक्ष

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तांदळा, शिंगारवाडी, शेकटा परिसरात शेतात काम करणाऱ्या शेतकरी व महिला मजुरांनी शुक्रवारी दुपारी ४ वाजता बिबट्या पाहाताच शेत सोडुन घरी गेल्याने, परिसरात भिती पसरली असून, शेत कामासाठी रेंगाळत आहेत,, नैसर्गिक आपत्ती मुळे परेशान झालेला शेतकरी बेजार झाला आहे, सध्या रब्बी पिकांचा हंगामातील गव्हु, ज्वारी, बाजरी, भाजीपाला लागवड पाणी असल्याने मोठ्या प्रमाणात झाली आहे, त्यातच पिकांचा पाणी देणे, खुरणपण करणे चा हंगाम वेगात सुरु असतांना शेतात बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी वर्ग व मजुर वर्ग शेतात जाण्यासाठी धजावत नसल्याने पिकांची मोठी हानी होवु शकते गेवराई वनविभाचे



आर एफ ओ श्री अमोल सांगुळे यांना भ्रमणध्वनी वरुन संपर्क केला असतात, त्यांनी तो घेतला नसल्याचे सांगितले जात आहे, त्यामुळे वनविभाग गाढ झोपेत असल्याने शेतकर्यांत संताप व्यक्त केला जात आहे

गेली आठ दिवसापूर्वीच फुलसांगवी मारकडवाडी शिवारात बिबट्यांनी मेढंपाळच्या घोड्यासह मेंढीचा फडशा पाडला होता, त्यांची भिती आसतांनाही शुक्रवारी तांदळा, शिंगारवाडी शेकटा शिवारात लागोपाठ गुरुवारी रात्री व शुक्रवारी दुपारी ४ वाजता भागवत कोळेकर यांच्या शेतात बिबट्याचे दर्शन त्याच्या मुलाला व खुरपणी करण्यार्या महीला मजुरांना झाल्याने त्यांनी शेतातून तात्काळ पलायन केले, भीतीने मुलाने घर गाठले, त्यामुळे परिसरात भिंतीचे वातावरण निर्माण झाले असून वेगात चालु असलेल्या शेतीकामाना ब्रेक लागला आहे, यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खरीप हंगाम संपुष्टात आला आहे, परंतु रब्बी हंगामात गव्हु, ज्वारी, बाजारी, भाजीपाला कडे शेतकर्यांच्या मोठा कल आहे, रब्बी हंगामातील खुरपणी चा वेग धरला आसतांनाच बिबट्यांनी दर्शन दिल्याने शेतकर्यांची पाचर धारण झाली आहे, त्यामुळे शेतमजूर शेतात कामाला येत नसल्याने हंगामात मोठ्या प्रमाणात घड होवुन पुन्हा एकदा बळीराजाची मोठी आर्थिक कोंडीत सोपडणाची दाट शक्यता वर्तवली जात आहे,

वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी नॉटरिचबल!

या परिसरात रानडुक्कर, हारणे, नीलगाय असे अनेक प्राणी संचार करत पिकांची नासाडी करत मात्र शेतकरी उपाय योजना करत त्यांच्या पासून पिकांचा बचाव करतात मैत्री हिंस्त्र प्राणी बिबट्यांच्या हल्ला करण्याचा भीतीने वनविभागाचा सहारा घेतात, परंतु भरपूर पगार असणारे वनविभागाचे अधिकारी दुर्लक्ष करतात, त्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे, आमचे प्रतिनिधी यांनी आर एफो ओ अमोल सांगुळे यांच्याशी भ्रमणध्वनी वरुन संपर्क केला आसता ते नोट रिचबल होते, अशा अधिकारी यांच्यावर डि एफ ओ यांनी कारवाई करावी नसता तात्काळ वनमंत्री यांच्याकडे लेखी तक्रार करणार असल्याचे अनेक सामाजिक कार्यकर्ते व शेतकरी यांनी सांगितले,

संतश्रेष्ठ भगवानबाबा आणि वामनभाऊ यांनी समाजजागृतीचे कार्य केले–भगवान महाराज राजपुत

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ भगवानबाबा आणि वैराग्यमूर्ती वामनभाऊ महाराज हे वारकरी संप्रदायात महान कार्य केले. समाज सुधारण्यासाठी बाबा आणि भाऊ यांचे सर्वश्रेष्ठ कार्य आहे. आध्यात्माबरोबरच समाजाला दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले. असे प्रतिपादन महंत ह.भ.प. भगवान महाराज राजपुत यांनी केले.

बीड येथील नगरोड भागातील माऊलीनगर येथे संत भगवानबाबा, वामनभाऊ, विठ्ठल- रुक्मिणी, हनुमान मूर्ती प्राण प्रतिष्ठापनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरीनाम सप्ताहात काल्याच्या कीर्तनात राजपुत महाराज बोलत होते. 'कोणी एकी भुलली नारी,विकिता गोरस घ्या म्हणे हरी, या जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर महंत ह.भ.प. भगवान महाराज यांनी विद्वत्तापूर्ण विवेचन करुन भाविकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी बोलतांना राजपूत महाराज म्हणाले, माऊलीनगरमध्ये संत श्रेष्ठ भगवानबाबा, वामनभाऊ, श्री विठ्ठल- रुक्मिणी आणि हनुमान

यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करून सुंदर आणि भव्य, दिव्य मंदिर उभारले आहे. एकात्मता आणि बंधुभाव निर्माण करणारे कार्य सप्ताहाच्या माध्यमातून होत आहे. काल्याच्या कीर्तनात ह.भ.प. भगवान महाराज राजपूत यांनी श्रीकृष्ण, गवळणी आणि सवंगडी यांच्या विविध क्रीडांचे विवेचन केले. राजपूत महाराज यांनी आपल्या कीर्तनात श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. गायनाचार्य म्हणून ह.भ.प. प्रसाद महाराज जवरे, हनुमान महाराज मुंडे, अंगद महाराज सोनवणे, अविनाश महाराज केदार, श्रीराम महाराज सानप, आश्रुबा महाराज सानप, नामदेव म. मुंडे, वैजनाथ म. सानप, तर मृदंगाचार्य ज्ञानेश्वर तांदळे यांनी साथसंगत केली. कार्यक्रमासाठी सप्ताह समितीतील केदारनाथ गुट्टे, वाघ सर, ढाकणे सर, जायभाये सर, भोंडवे आन्नासाहेब, बाळासाहेब केकान, नागरे तुकाराम, गर्जे सोपान फौजी, वारे बाबासाहेब फौजी, खाडे प्रभु, श्रीराम सानप, बाळासाहेब आर्दीची उपस्थिती शेवटची महाप्रसाद पंगत श्री तांबे सुंदर सर, मच्छिंद्र तांबे, नानासाहेब तांबे आर्दीनी दिली.

ईगलवुड इंग्लिश स्कूल येथे क्रीडा सप्ताह व हेमंत शिबिराचा उत्साहात शुभारंभ संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

ईगलवुड इंग्लिश स्कूल माजलगाव या शाळेत क्रीडा सप्ताह तसेच हेमंत शिबिराचा उद्घाटन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या निमित्ताने पवार हॉस्पिटलपासून मशाल दौडीचे आयोजन करण्यात आले होते.या मशाल दौडीमुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाविषयी उत्साह व शिस्तीची भावना निर्माण झाली.

शालेय मंचावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आकर्षक मार्चपास्ट तसेच कवायतीचे विविध प्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावर्षीचा क्रीडा सप्ताह भारतीय महिला क्रिकेट संघाला समर्पित करण्यात आला असून,महिलांच्या क्रीडा क्षेत्रातील यशाचा गौरव करण्याचा उद्देश यामागे होता.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष

म्हणून ॲड.दीपक देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार वेजनाथ घायतिडक उपस्थित होते. तसेच संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार,संस्थेचे सचिव डॉ.शरद पवार, शाळेचे प्राचार्य सत्यजित कांजाळकर सर व उपप्राचार्या प्रणिता कांजाळकर मॅडम यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले आणि अध्यक्षांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासातच नव्हे तर क्रीडा व शिस्तीच्या बाबतीतही उत्कृष्ट कामगिरी करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.तसेच या कार्यक्रमास अभूतपूर्व सोहळा असे संबोधले. डॉ.अर्चना पवार मॅडम यांनी या तीन दिवस चालणाऱ्या क्रीडा सप्ताह तथा हेमंत शिबिराची घोषणा केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सत्यजित सरांनी केला. तसेच सूत्रसंचालन वरद काळे आणि शेख आहाद या विध्यार्थ्यांनी केले. हा सोहळा यशस्वी होण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

जिल्हा परिषदेचे सहाय्यक प्रशासन अधिकारी कैलास तांगडे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागातील कनिष्ठ सहाय्यक प्रशासन अधिकारी कैलास लक्ष्मण तांगडे यांचे दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुखद निधन झाले.

तांगडे बापू यांची बीड जिल्हा परिषदेत २५ वर्षे सेवा झाली आहे. त्यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग, सामान्य प्रशासन विभाग, पंचायत विभाग आणि पंचायत समिती, पाटोदा येथे उल्लेखनीय काम केले आहे. अनुभवी, अभ्यासू, कार्यतत्पर आणि प्रामाणिक कर्मचारी म्हणून त्यांना ओळखले जाते.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी २.०० वाजता बीड येथील अंकुशनगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. तांगडे बापू यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी

असा परिवार आहे.

अंत्यसंस्कारास बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, प्रभारी मुख्य व वित्त अधिकारी आबासाहेब घायाळ यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

पुर्णवादी नागरीक सहकारी बैंकेच्या दिनदर्शिकीचे वितरण

माजलगांव । प्रतिनिधी

शहरातील कार्यन्वीत अग्रगण्य पू र्णवादी नागरीक सहकारी बँक प्रति वर्षी त्यांच्या सभासद व ग्राहकांना बँकेचा प्रसार व नुतन वर्षाच्या शुभेच्छाकरीता दिनदर्शिका भेट म्हणुन वितरित करते. माजलगाव शाखेतील सन्मानिय सभासद व ग्राहक यांना दिनदर्शिकेचे वितरन(वाटप)१८ डिसेंबर गुरूवार रोजी शाखाधिकारी तात्यासाहेब शेंडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रसंगी शाखाधिकारी तात्यासाहेब शेंडगे यांनी बँकेचे सभासद व ग्राहकांना येत्या नुतन वर्षाच्या शुभेच्छा देत बँकेच्या प्रगतीकरीता सहकार्य करण्याचे आवाहन केले. दरम्यान उपस्थीतांना दिनदर्शिकीचे वितरण करण्यात आले.यावेळी पत्रकार राजाभाऊ पास्टे,ॲड .सजगणे, बँकेचे सभासद लक्ष्मण तौर,रमेश जाधव,पासिंग ऑफिसर मनीष नाईक, महेश जाब्रश, अमोल कुलकर्णी, नरेश पोतेकर, राजेभाऊ डौले, रवी चव्हाण, अशोक नाईक, सचिन कुर्डूकर, रमेश कुलकर्णी , टेंभूर्णे परमेश्वर, बँकेचे अधिकारी, कर्मचारी,सभासद, ग्राहक उपस्थीत होते.

पान ६ वरुन...

एसबीआय ग्राहक सेवा

फुटेजच्या आधारे चोरट्यांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे माणिकनगर व हनुमान चौक परिसरातील व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरात रात्रगस्तीची मागणी होत आहे. शहरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे पोलिस प्रशासनाने अधिक सतर्कता बाळगावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास परळी शहर पोलीस करीत आहेत.

कर्तव्यावर असताना तरुण

अंत्यसंस्काराला सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह पोलिस खात्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.त्यांच्या पश्चात वडील, आई, भाऊ, पत्नी व मुलगी असा मोठा परिवार आहे. कर्तव्यावर असताना प्राण गमावलेल्या सुदाम पोकळे यांना पोलीस खात्यासह संपूर्ण परिसरातून श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरून निघणारी आहे.ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे असह्य दुःख सहन करण्याची शक्ती देवो, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

आष्टीचे प्रसिद्ध कापड

पवार वय वर्ष ३८ रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यांच्या मृतदेह अंबाजोगाई येथे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. अपघाताची माहिती मयत व्यापाऱ्यांच्या नातेवाईकांना दिली असून ते अंबाजोगाईकडे रवाना झाले आहेत. त्यांच्या पश्चात आई, वडील, २ भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

मनमिळावू स्वभावामुळे त्यांचा जनसंपर्क मोठा होता. त्यांच्या निधनाने तालुक्यात शोककळा पसरली आहे.

प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल

भैय्या आंधळे,इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती शितल लाटणे या मान्यवर म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे गोड आवाजात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे सूत्रसंचालन इंग्लिश स्कूलच्या पर्यवेक्षिका सौ.नितल कुरकुटे यांनी केले तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापिका शोभाताई आंधळे मॅडम यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इंग्लिश स्कूलमधील पर्यवेक्षिका सौ.तांबडे, सांस्कृतिक विभागप्रमुख सौ.चव्हाण, सौ.उपरे, सौ.अबुज, सौ.बडे, सौ.दिवटे, सौ.केदार, सौ.टिपरे, कु.गवळी,कु.चव्हाण आदी मॅडमनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पालक विद्यार्थी उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ९०५/२०२५
राम शिवाजी सुरवसे
ग्रामपंचायत कार्यालय कुंभारी

पहा

१.राम शिवाजी सुरवसे रा.कुंभारी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक राम शिवाजी सुरवसे यांचा दिनांक १८/०१/२००४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय कुंभारी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कुंभारी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १८/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०१/२०२६ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८६७/२०२५
शिवाजी भिवा निर्मळ
ग्रामपंचायत कार्यालय देवीबाभुळगाव/चांदेगाव

पहा

१.शिवाजी भिवा निर्मळ रा.देवीबाभुळगाव/चांदेगाव ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक बालाजी शिवाजी निर्मळ यांचा दिनांक ०१/०२/१९९५ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय देवीबाभुळगाव/चांदेगाव ता.जि.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय देवीबाभुळगाव/चांदेगाव ता.जि.बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/०१/२०२६ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८२२/२०२५
कृष्णा निवृत्ती ठोसर
ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर

पहा

१.कृष्णा निवृत्ती ठोसर रा.नेकनूर ता.जि.बीड (ह.मु.जाफ्राबाद जि.जालना)

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समर्थ कृष्णा ठोसर यांचा दिनांक ०७/०७/२०१२ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/०१/२०२६ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८२७/२०२५
समाधान सखाराम भालेराव
ग्रामपंचायत कार्यालय मन्यारवाडी

पहा

१.समाधान सखाराम भालेराव रा.मन्यारवाडी ता.जि.बीड (ह.मु.भोसरी पुणे)

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक समाधान सखाराम भालेराव यांचा दिनांक ०५/०९/१९८८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय मन्यारवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे मन्यारवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/०१/२०२६ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

जाहिर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ८६४/२०२५
विजय पि.सिताराम पिंपळे
ग्रामपंचायत कार्यालय लोणीघाट

पहा

१.विजय पि.सिताराम पिंपळे रा.लोणीघाट ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक विजय सिताराम पिंपळे यांचा दिनांक २४/०६/१९९४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालय लोणीघाट ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लोणीघाट ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १९/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १९/०१/२०२६ ही आहे

स्वाक्षरीत
तहसिलदार, बीड

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.२० डिसेंबर २०२५
४

खाद्यसंस्कृतीपासून महिला सक्षमीकरणापर्यंत

निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांच्या नेतृत्वाखाली यशस्वी ठरले महाराष्ट्र खाद्य महोत्सव

नवी दिल्ली– १७ : दिल्लीच्या मध्यवर्ती कस्तुरबा गांधी मार्गावरील भव्य व आधुनिक नवीन महाराष्ट्र सदनात १२ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र खाद्य महोत्सव२०२५'चा समारोप, १४ डिसेंबर रोजी, अत्यंत उत्साही आणि सकारात्मक वातावरणात झाला. तीन दिवस चाललेल्या या महोत्सवाने महाराष्ट्राची समृद्ध पाककृती परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि ग्रामीण महिला सक्षमीकरणाचा एक प्रभावी परिचय राजधानी दिल्लीला करून दिला. दिल्लीकर, पर्यटक आणि विविध राज्यांतील अभ्यागतांनी या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत 'एक राज्य, अनंत चव' या महाराष्ट्राच्या ओळखीला ठळकपणे अधोरेखित केले.या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनामागे महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि प्रभावी नियोजन कारणीभूत ठरले. श्रीमती आर. विमला यांनी या उपक्रमाला केवळ खाद्य महोत्सवापुरते मर्यादित न ठेवता, त्याला सामाजिक आशय दिला. ग्रामीण भागातील महिलांना राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कौशल्याला ओळख मिळावी आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने त्यांनी 'उमेद' योजनेअंतर्गत कार्यरत महिला बचत गटांना या महोत्सवात सहभागी करून घेतले. त्यांच्या या निर्णयामुळे अनेक ग्रामीण महिलांची स्वप्ने प्रत्यक्षात उतरली आणि हा महोत्सव महाराष्ट्राच्या संस्कृती, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाचा प्रेरणादायी उत्सव ठरला.

श्रीमती आर. विमला यांच्यासोबत निवासी गुंतवणूक आयुक्त श्री सुशील गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला. परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक प्रमोद कोळपते, उपअभियंता किरण चौधरी, आशुतोष द्विवेदी, सहायक लेखाधिकारी निलेश केदारे , सारिका शेलार, , महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सुनील कनगीरी , महाराष्ट्र सुरक्षा बलाचे अनिल चोरगे यांच्यासह महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राचे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे नियोजन, अंमलबजावणी आणि समन्वयाच्या प्रत्येक टप्प्यावर काटेकोर व्यवस्थापन दिसून आले. प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी महाराष्ट्राच्या पाककृतीतील प्रादेशिक विविधतेवर प्रकाश टाकून, पारंपरिक खाद्यसंस्कृती जपण्याची गरज अधोरेखित केली.महोत्सवात महाराष्ट्राच्या विविध विभागांतील महिला स्वयंसहायता समूह आणि बचत गटांनी पारंपरिक तसेच लोकप्रिय खाद्यपदार्थ सादर केले. यात विदर्भातील सावजी पदार्थ, खानदेशी पुरणपोळी व ठेचा-भाकर, पश्चिम महाराष्ट्रातील मटण-चिकन थाळी, कोल्हापुरी मिसळ व तांबडा-पांढरा रस्सा, कोकणातील मोदक व समुद्री मासळीचे पदार्थ, तसेच मराठवाड्यातील झणझणीत पदार्थांना मोठी पसंती मिळाली. पारंपरिक पद्धतीने तयार केलेल्या घरगुती पदार्थांमुळे महाराष्ट्राच्या खाद्यपरंपरेची अस्सल चव राजधानीतील नागरिकांना अनुभवता आली.

महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) चा विशेष माहिती स्टॉल होता, जिथे महाराष्ट्रातील प्रमुख पर्यटन स्थळांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली. या महोत्सवात लहान मुलांसाठी करमणूक उपक्रम, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे कडक सुरक्षा व्यवस्थापन आणि सुमित प्रायव्हेट लिमिटेडने केलेली प्रभावी स्वच्छता व्यवस्था यामुळे अभ्यागतांनी स्वच्छ, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणाचा अनुभव घेतला. 'महाराष्ट्र खाद्य महोत्सव२०२५'चे यश दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्रभावी प्रसिद्धी व्यवस्थापन आणि महिला सक्षमीकरणावर आधारित विश्वासाचे यश आहे. भविष्यात अशा उपक्रमांचे अधिक व्यापक स्वरूपात आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करत महोत्सवाचा यशस्वी समारोप झाला.

–निलेश देशमुख, सहायक ग्रंथपाल, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली

महिला सक्षमीकरणाला राष्ट्रीय स्तरावर चालना

महोत्सवाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'उमेद' योजनेअंतर्गत कार्यरत महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग होता. या सहभागामुळे ग्रामीण भागातील महिलांना केवळ आर्थिक संधीच मिळाल्या नाहीत, तर त्यांच्या कौशल्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली. दिल्लीसारख्या मोठ्या शहरात आपली उत्पादने सादर करण्याची संधी मिळाल्याने आत्मविश्वास वाढल्याचे मत सहभागी महिला बचत गटांच्या सदस्यांनी व्यक्त केले. समारोपप्रसंगी श्रीमती आर. विमला यांच्या हस्ते सहभागी महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला. अनेक महिला बचत गटांनी निवासी आयुक्त श्रीमती आर. विमला यांचे मनापासून आभार मानले. ''विमला मॅडम यांच्या आमंत्रणामुळे आणि विश्वासामुळेच आम्हाला दिल्लीत येण्याची संधी मिळाली,'' अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली. हा महोत्सव त्यांच्यासाठी आत्मसन्मान आणि ओळखीचा टप्पा ठरला.

प्रभावी प्रसिद्धी व्यवस्थापनाचे नियोजन

या महोत्सवाची माहिती व्यापक प्रमाणात पोहोचवण्याची जबाबदारी महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल आणि जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे यांनी अत्यंत कुशलतेने पार पाडली. त्यांच्या सर्जनशील आणि रणनीतीपूर्ण नेतृत्वामुळे महोत्सवाची दखल दिल्लीतील प्रमुख वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल माध्यमे, रेडिओ चॅनेल्स तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर प्रभावीपणे घेतली गेली. पोस्टर्स, प्रेस नोट्स, सोशल मीडिया कॅम्पेन्स आणि माध्यमांशी सातत्यपूर्ण संवाद या माध्यमांतून महोत्सवाची माहिती हजारो नागरिकांपर्यंत पोहोचली. अनेक अभ्यागतांनी ''सोशल मीडियावर माहिती पाहून आलो'' अशी प्रतिक्रिया दिली, ज्यामुळे प्रसिद्धी यंत्रणेच्या यशाची प्रचिती आली. या प्रयत्नांमुळे महोत्सवाची ओळख केवळ दिल्लीपुरती न राहता, राष्ट्रीय स्तरावर पोहोचली.

घरच्या घरी तयार करा निंबोळी अर्क; प्रभावी व पर्यावरणपूरक किटकनाशक

रासायनिक कीटकनाशकांच्या अतिरेकी वापरामुळे पिकांचे नुकसान, मातीच्या गुणवत्तेचा ऱ्हास, मानवी आरोग्यावर दुष्परिणाम आणि पर्यावरणीय संकटे या समस्या गंभीर बनल्या आहेत. यावर एक नैसर्गिक, प्रभावी व किफायतशीर उपाय म्हणजे निंबोळी अर्क. हे किटकनाशक घरच्या घरी तयार करता येते, तेही कोणताही अतिरिक्त खर्च न करता.

निंबोळी अर्क म्हणजे काय? : कडूनिंबाच्या पिकलेल्या फळांपासून तयार होणारा हा अर्क मावा, तुडतुडे, अमेरिकन बोंडअळी, पाने पोखरणारी व देठ कुरतडणारी अळी, फळमाशी, खोडकीडा इत्यादी किडींवर अत्यंत प्रभावी आहे. ५% प्रमाणात फवारणी केल्यास हे किड नियंत्रण सुनिश्चित करता येते.

घरच्या घरी निंबोळी अर्क तयार करण्याची सोपी पद्धत : बांधावर किंवा रस्त्याच्या कडेला पडलेल्या पिकलेल्या निंबोळ्या गोळा करा. त्यातील साल व गर काढून फक्त बिया स्वच्छ धुवून सावलीत वाळवा. कोरड्या ठिकाणी साठवून ठेवा. या बिया खलबत्यात किंवा पल्वरायझरमध्ये बारीक करून ५ किलो पावडर तयार करा. ती ९ लिटर पाण्यात भिजवा. दुसऱ्या भांड्यात १ लिटर पाण्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी निंबोळी अर्क कपड्यातून गाळा. त्यात साबणाचे द्रावण मिसळा. हे मिश्रण ९० लिटर पाण्यात मिसळून १०० लिटर फवारणीयोग्य द्रावण तयार करा.

फायदे : प्रभावी कीड नियंत्रण. अत्यल्प खर्च. सहज उपलब्ध व घरच्या घरी तयार करता येणारा उपाय. पर्यावरणपूरक आणि निसर्गाशी सुसंगत. उत्पादन खर्चात बचत, नफ्यात वाढ. निंबोळी अर्क फवारणीच्या दिवशीच तयार करावा. बाजारातील दर्जाहीन सेंद्रिय किटकनाशकांपेक्षा घरचा अर्क अधिक प्रभावी व सुरक्षित ठरतो.

भारत आणि अर्जेंटिनामध्ये करार; तेलबिया, कडधान्यासाठी दोन्ही देश संयुक्त संशोधन करणार

पुणे : भारत आणि अर्जेंटिना यांनी कृषी संशोधन व तांत्रिक सहकार्य मजबूत करण्यासाठी महत्त्वाचं पाऊल टाकलं आहे. भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर) आणि अर्जेंटिनाची नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲग्रिकल्चरल टेक्नोलॉजी (आयएनटीए) यांच्यात २०२५-२७ या कालावधीसाठी कार्य नियोजनावर सहमती झाली आहे. या करारांतर्गत पुढील तीन वर्षांत कृषी संशोधन, तंत्रज्ञानाचे आदान-प्रदान आणि मानवी संसाधन विकासासाठी दोन्ही देश संयुक्तपणे काम करणार आहेत.

कृषी संशोधन व शिक्षण विभागाचे सचिव आणि आयसीएआरचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट तसेच भारतातील अर्जेंटिनाचे राजदूत मारियानो ऑगस्टिन काउचिनो यांच्यात नुकताच औपचारिक करार झाला आहे. हा करार भारतअर्जेंटिना कृषी भागीदारीला नवी उंची देणारा ठरेल, असा दावा केला जात आहे. उत्तम गुणधर्म असलेल्या पिकांचे बियाणे किंवा जनुकीय साठा एकमेकांना देण्यात येणार आहेत. यामध्ये सोयाबीन, सूर्यफूल, मका, ब्लूबेरी, सायट्रस फळे, जंगली पपईच्या प्रजाती, पेरू आणि निवडक भाजीपाला पिकांचा समावेश आहे. तसेच वेस्ट-टू-वेल्थ तंत्रज्ञान, मायक्रोबियल फीड एन्हान्समेंट, डिजिटल शेती आणि सॅनिटरी व फायटोसॅनिटरी प्रणालींशी संबंधित प्रशिक्षण कार्यक्रमही या सहकार्याचा भाग असतील. भारतातील तेलबिया आणि कडधान्य उत्पादन वाढीसाठी केंद्र सरकार प्रयत्न करत असल्याचा दावा करत आहे. याच पार्श्वभूमीवर ते लबिया आणि कडधान्यांची मूल्य साखळी मजबूत करण्यासाठी दोन्ही देश एकत्रितपणे काम करणार आहेत. कृषी यंत्रीकरणाच्या क्षेत्रात झिरो टिलेज यंत्रे, कापूस काढणी यंत्रे आणि ड्रोन तंत्रज्ञानावर सहकार्य वाढवले जाईल. तर बागायती क्षेत्रात पायाभूत सुविधा विकास आणि रोपण साहित्याच्या आदान-प्रदानावरही सहमती झाली आहे.

लाळ्या आणि खुरकुत निर्मूलनाचे उद्दिष्ट

पशुधन आरोग्याच्या क्षेत्रात प्रादेशिक गरजांनुसार लाळ्या आणि खुरकूत रोग निर्मूलनासाठी रणनीती करण्यात येणार आहे. तसेच टोळधाड निरीक्षण व व्यवस्थापनात तांत्रिक सहकार्य आणि देवाणघेवाण केली जाईल. या वैज्ञानिक भागीदारीची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी दरवर्षी आढावा घेण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली आहे.

गाजर गवतापासून बनवा उत्तम सेंद्रिय खत

गाजर गवत पावसाळ्यात स्वत:च उगवते, पण त्याचा वापर न झाल्यामुळे शेतकरी तो कापून शेताबाहेर फेकतात किंवा रासायनिक पद्धतींनी नष्ट करतात.परंतु आता या गाजर गवताचा एक अनोखा वापर शास्त्रज्ञांनी शोधला आहे, जेणेकरून आता गाजर गवताचा वापर शेतीसाठी विशेष कंपोस्ट खत तयार करण्यासाठी केला जाईल. यामुळे एका बाजूला गाजर गवताचा वापर होईल आणि दुसरीकडे शेतकऱ्यांना नैसर्गिक आणि स्वस्त खते उपलब्ध होतील. पर्यावरण समिती उदयपूर आणि फॉस्टर इंडियन एनवायरनमेंट सोसायटी इंटली यांच्या संयुक्त तत्वाखाली गाजर गवतपासून विशिष्ट कंपोस्ट खत उत्पादन तंत्रज्ञानाचा शोध लागला आहे.नॅशनल इनोव्हेशन डिस्कव्हरी प्रोग्राम अंतर्गत शोधनिबंधात गाजर गवत सोडवून एक विशेष कंपोस्ट खत बनवले. यासाठी त्यांना दोन वर्षाचा कालावधी लागला. या तंत्राने बनवलेल्या खतामध्ये नायट्रोजन, स्फुरद, पोटॅशियमचे प्रमाण सामान्य हिरव्या खतापेक्षा तीनपट अधिक मोजले गेले, जे शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. संशोधनामुळे गाजर गवत निर्मूलनाच्या स्वरूपात दोघांनाही फायदा होईल आणि शेतकऱ्यांना त्यातून सेंद्रिय खत मिळेल. शेतकरी गाजर गवत (पार्थेनियम) पिकासाठी खत म्हणून वापरू शकतात, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल.

गाजर गवतपासून खत :या तंत्रात शेण, कोरडे पाने, पिकाचे अवशेष, राख, लाकूड भूसा इत्यादी कचरा सेंद्रिय पदार्थाचा एक भाग आणि गाजर गवतचे चार भाग या प्रमाणात बनवलेल्या एका लाकडी खोक्यामध्ये मिसळले जातात. या बॉक्सच्या भोवती छिद्र बनवले जातात, जेणेकरून हवेचा प्रवाह योग्य राहील आणि गाजर गवत लवकर खतामध्ये विघटित होऊ शकेल. यामध्ये रॉक फॉस्फेट आणि ट्रायकोडर्मा बुरशीचा वापर करून कंपोस्टमधील पोषक घटकांचे प्रमाण वाढवता येते. अशाप्रकारे, गाजर गवतपासून केवळ २ महिन्यांत सतत पाणी शिंपडून आणि ठराविक अंतराने हे मिश्रण उलथून हवा प्रदान करून सेंद्रिय खत तयार केले जाऊ शकते.

खतामध्ये पोषक घटकांचे प्रमाण जास्त : संशोधनानुसार गाजर गवतपासून बनवलेल्या कंपोस्टमध्ये मुख्य पोषकद्रव्ये शेण आणि गांडुळाच्या खतापेक्षा दुप्पट असतात. अशा परिस्थितीत गाजर गवत खत एक चांगला पर्याय बनू शकतो. नायट्रोजन १.०५, फॉस्फरस १०.८४, पोटॅशियम १.११, कॅल्शियम ०.९० आणि मॅग्नेशियम ०.५५ टक्के गाजर गवत आढळतात.गांडुळ खतात नायट्रोजन १.०५, फॉस्फोरस १०.८४, पोटेशियम १.११, कॅल्शियम ०.९० तसेच मॅग्नेशियम ०.५५ टक्के आढळते. अशाप्रकारे, गाजर गवतमध्ये पोषक तत्वांचे प्रमाण जास्त आहे. गाजर गवतचे फायदे :गाजर गवताचे कंपोस्ट हे एक सेंद्रिय खत आहे, ज्याचा वापर पिके, मानव आणि प्राण्यांवर कोणताही परिणाम करत नाही. गाजर कंपोस्ट एक संतुलित कंपोस्ट आहे ज्यात नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅश घटकांचे प्रमाण शेणखतपेक्षा जास्त असते. कंपोस्ट बनवताना, गाजरच्या जिवंत अवस्थेत आढळणारे विषारी रासायनिक पार्थेनिन पूर्णपणे विघटित होते. त्यामुळे ते पिकांसाठी पूर्णपणे सुरक्षित आहे. या मुख्य पोषक व्यतिरिक्त गाजर कंपोस्टमध्ये सूक्ष्म पोषक घटक देखील असतात जे पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी उपयुक्त असतात.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१८९८ : पियरे आणि मेरी क्यूरी यांनी रेडियम चा शोध लावला.
१९०५ : स्वातंत्र्यवीर सावरकर बी. ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले.
१९०९ : अनंत कान्हेरे यांनी नाशिकचे जिल्हाधिकारी जॅक्सन यांचा गोळ्या घालून वध केला.
१९१३ : ऑर्थर वेन यांनी लिहिलेले जगातील पहिले शब्दकोडे न्यूयॉर्क वर्ल्ड या दैनिकात प्रकाशित झाले.
१९५२ : सोवियत संघाचा लेनिन शांती पुरस्कार मिळवणारे सैफुद्दीन किचलू पहिले भारतीय बनले.
१९६५ : दादा कोंडके निर्मित व दिग्दर्शित आणि वसंत सबनीस लिखित 'विच्छा माझी पुरी करा' या नाटकाचा पहिला प्रयोग धोबीतलाव येथील रंगभवन येथे झाला.
१९७१ : कर्ट वाल्डहाइम संयुक्त राष्ट्र संघाचे चौथे सरचिटणीस बनले.
१९७५ : मेडागास्कर या देशाने संविधान लागू केले.
१९८६ : रघुनंदन स्वरुप पाठक यांनी भारताचे १८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९८ : नेपाल चे प्रधानमंत्री गिरिजा प्रसाद कोइराला यांनी राजीनामा दिला.
२०१२ : आजच्या दिवशी गंगनम स्टाइल हे कोरियन गाण्याला युट्यूब वर १ अब्ज लोकांनी पाहिले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०४ : बेंजामिन डिझरेली इंग्लंडचे पंतप्रधान (मृत्यू: १९ एप्रिल १८८१)
१८२४ : जेम्स पार्किन्सन कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे, हे सिद्ध करणारा शास्त्रज्ञ (जन्म: ११ एप्रिल १७५५)
१८९१ : श्रमिक आंदोलनाचे सूत्रधार प्रणेता ठाकुर प्यारेलाल सिंह यांचा जन्म.
१९०३ : भालचंद्र दिगंबर तथा आबासाहेब गरवारे प्लॅस्टिक व नायलॉन उद्योगाचे जनक, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील एक प्रमुख शिल्पकार, पद्मभूषण, डि. लिट. (पुणे विद्यापीठ), उद्योजक (मृत्यू: २ नोव्हेंबर १९९०)
१९९७ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली.
१९१८ : कुर्त वाल्ढहाईम संयुक्त राष्ट्रांचे चौथे सरचिटणीस (मृत्यू: १४ जून २००७)
१९२१ : पी. एन. भगवती भारताचे १७ वे सरन्यायाधीश
१९३२ : भारतीय लेखक, कवी आणि समीक्षक यू.एन. अनंतमूर्ती यांचा जन्म. (मृत्यू: २२ ऑगस्ट २०१४)
१९४२ : हू जिंताओ चीनचे राष्ट्राध्यक्ष
१९५० : ड्रीमवर्क्स ॲनिमेशनचे सहसंस्थापक जेफरी कॅझनबर्ग यांचा जन्म.
१९५४ : ख्रिस एव्हर्ट लॉइड अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू
१९५९ : कृष्णम्माचारी श्रीकांत धडाडीचे आघाडीचे फलंदाज, क्रिकेट कप्तान व निवड समितीचे अध्यक्ष
१९५९ : फ्लॉरेन्स ग्रिफिथ जॉयनर अमेरिकेची धावपटू (मृत्यू: २१ सप्टेंबर १९९८)
१९६३ : हिंदी चित्रपट अभिनेते गोविंदा यांचा जन्म.
१९६३ : जॅक हॉब्ज इंग्लिश क्रिकेट खेळाडू (जन्म: १६ डिसेंबर १८८२)
१९७२ : भारतीय पत्रकार आणि राजकारणी वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांचा जन्म.
१९७४ : ''रॅमन मॅग्सेसे पुरस्कार'' विजेते संजीव चतुर्वेदी यांचा जन्म.
१९७९ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (जन्म: १५ एप्रिल १८९३)
१९८१ : छत्तीसगड चे सामाजिक क्रांती चे नेते सुंदरलाल शर्मा यांचा जन्म.
१९८५ : मधे जयसिंगपूर येथे झालेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. (जन्म: ४ जुलै १९१४)
१९९३ : मल्हार रंगनाथ तथा राजाभाऊ कुलकर्णी स्वातंत्र्यसैनिक आणि पत्रकार (जन्म:)
१९९७ : पं. प्रभाशंकर गायकवाड सनईवादक (जन्म:)

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२४ : जेम्स पार्किन्सन कंपवाताचा मानवी मेंदूशी संबंध आहे, हे सिद्ध करणारा शास्त्रज्ञ (जन्म: ११ एप्रिल १७५५)
१९६३ : जॅक हॉब्ज इंग्लिश क्रिकेट खेळाडू (जन्म: १६ डिसेंबर १८८२)
१९७९ : नरहर रघुनाथ तथा न. र. फाटक चरित्रकार, टीकाकार, इतिहास संशोधक, संत साहित्याचे अभ्यासक व लेखक (जन्म: १५ एप्रिल १८९३)
१९९३ : मल्हार रंगनाथ तथा राजाभाऊ कुलकर्णी स्वातंत्र्यसैनिक आणि पत्रकार (जन्म:)
१९९७ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली. १९८५ मधे जयसिंगपूर येथे झालेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. (जन्म: ४ जुलै १९१४)
१९९७ : पं. प्रभाशंकर गायकवाड सनईवादक (जन्म:)
२००४ : भारतीय न्यूरोलॉजिस्ट औतार सिंग पेंटल यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९२५)
२००६ : तुर्कमेनिस्तानचे पहिले राष्ट्रपती रूपमूर्त निझाव यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९४०)
२००७ : अमिताभ बच्चन यांच्या आई तेजी बच्चन यांचा जन्म.
२०११: प्रसिद्ध न्यूक्लियर फिजिसिस्ट पी.के.अयंगर यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि. २० डिसेंबर २०२५
५

ना. पंकजा मुंडेंनी घेतला जालना व छत्रपती संभाजीनगरमधील

प्रदुषण नियंत्रण उपाययोजनांचा आढावा

जालनामधील वायू प्रदुषण कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश

मुंबई। प्रतिनिधी

जालना व छत्रपती संभाजीनगरमधील प्रदुषण कमी करण्यासंदर्भात आज पर्यावरण व वातावरणीय मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला. जालनामधील हवा प्रदुषणासंदर्भात चिंता व्यक्त करून हे प्रदुषण कमी करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत. तसेच उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन प्रदुषण करणाऱ्या उद्योगांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याच्या सूचना श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिल्या. जालना औद्योगिक वसाहत तसेच छत्रपती संभाजी नगरमधील वाळुंज, शेंद्रा, ऑरिक सिटी औद्योगिक वसाहतींमधील वायू व जल प्रदुषणासंदर्भात आज श्रीमती मुंडे यांनी मंत्रालयात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंग, सहसंचालक (हवा प्रदुषण) सतीश पडवळ यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील प्रादेशिक अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे व जिल्हा प्रशासनातील अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जालना औद्योगिक वसाहतीमध्ये स्टिल उद्योगामुळे हवेत धुळीकण उडत असल्याने प्रदुषण होत आहे. यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. या धुलिकणांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे धुलीकणांवर नियंत्रणासाठी संबंधित कंपन्यांनी प्राथमिक हवा प्रदुषण नियंत्रण संयत्रणांमध्ये सुधारणा करून घेण्यासंबंधी त्यांना कळविण्यात यावे. जे अशी यंत्रणा उभारणार नाहीत त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश श्रीमती मुंडे यांनी यावेळी दिले. छत्रपती संभाजी नगरमधील वाळुंज औद्योगिक वसाहतीमध्ये जल प्रदुषण रोखण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया युनिट कार्यरत आहे. येथील सांडपाण्यावर १०० टक्के पुनर्वापरासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे येथे प्रक्रिया केलेले पाणी खाम नदीत न सोडता त्याचा पुनर्वापर होण्यासाठी योग्य खबरदारी घेण्यात यावी, अशा सूचना मंत्री श्रीमती मुंडे यांनी दिल्या. श्री. सिंग यांनी जालना व वाळुंज येथील प्रदुषणासंबंधीची माहिती देऊन प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. जालना औद्योगिक वसाहतीमध्ये हवा प्रदुषणासाठी पातळी तपासण्यासाठी फिरत्या वाहनाद्वारे वायू गुणवत्ता निरीक्षण केले जात आहे. तसेच वाळुंज औद्योगिक वसाहतीमध्ये सांडपाणी प्रकल्पामध्ये प्रक्रिया केलेले सांडपाणी न पाठविणाऱ्या ५३ उद्योगांना निर्देश देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

निवडणूक अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात शस्त्रास्त्रे बाळगण्यास बंदी -जिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलीस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन ४१७१ व ४२४३/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन जिल्ह्यातील महानगरपालिका कार्यक्षेत्रातील परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास बंदी घालण्यात आली आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०२५कार्यक्रम घोषित करण्यात आला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श आचार संहिता दि. १५ डिसेंबर २०२५ पासुन लागु झाली आहे, सदर निवडणुका निर्भय आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यत, शस्त्र परवानाधारक यांना परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करणे आवश्यक आहे. जिल्हयातील शस्त्र परवानाधारकास नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढण्यात आले आहेत. संबंधित शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एक आठवडयाचे आत संबधितांचे शस्त्र परत करण्यात यावे. सदर आदेश जालना जिल्ह्यासाठी निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन दि. १६ जानेवारी २०२६ पर्यंत अंमलात राहील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

राष्ट्रीय पाठशाळा विद्यालयात निर्भया पथकाकडून विद्यार्थी सुरक्षिततेबाबत जनजागृती

अहिल्यानगर

जिल्हा पोलीस दलाच्या निर्भया पथकाच्या वतीने राष्ट्रीय पाठशाळा विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रात्यक्षिकासह जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे तसेच शहर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरेसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या प्रसंगी शहर निर्भया पथकाच्या प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे, महिला पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती नागरे, महादीक, खाटीक तसेच पोलीस कॉन्स्टेबल संदीप थोरात आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पोलीस उपनिरीक्षक शीतल मुगडे यांनी शाळा परिसरातील सुरक्षिततेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

शाळेच्या प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे, विद्यार्थ्यांना गणवेश व ओळखपत्राशिवाय शाळा परिसरात प्रवेश न देणे, परिसरात विनाकारण फिरणाऱ्या व्यक्तींविरोधात तत्काळ कारवाई करणे व पोलिसांना माहिती देणे, शाळेत उच्च दर्जाचे व जास्त साठवण क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, तक्रार पेटीची व्यवस्था करणे आदी सूचना त्यांनी दिल्या. तसेच बसचालक, सुरक्षा रक्षक, सफाई कर्मचारी यांची पोलीस चारित्र्य पडताळणी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या बॅग व लॉकरची वेळोवेळी तपासणी करणे, महिला शिक्षक अथवा कर्मचाऱ्यांची निर्भया

पथक समन्वयक म्हणून नेमणूक करणे आणि महिला सुरक्षा व सायबर सुरक्षेबाबत नियमित जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचे आवाहन करण्यात आले. कोणतीही अडचण उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता थेट निर्भया पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. या वेळी निर्भया पथकाने शाळेतील सीसीटीव्ही, तक्रार पेटी, संरक्षक भिंती तसेच सुरक्षिततेशी संबंधित सर्व नोंदी तपासून समाधान व्यक्त केले. सर्व बाबी अद्ययावत व योग्य असल्याबद्दल शाळा प्रशासनाचे कौतुक करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक जगन्नाथ बोडखे यांनी निर्भया पथकाचे स्वागत करून आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक प्रविण उकिर्डे, सतीश काळे,स्वप्निल व्यवहारे,गणेश काथवटे, रामनाथ घनवट, कविराज बोटे,सुशील ननवरे, संजय सकट,आबासाहेब बेडके,बाबासाहेब पातकळ,अशोक चव्हाण,विजय वाणी,तुकाराम विघ्ने तसेच विद्यार्थी उपस्थित होते

मतदार यादीत दोन नाव असल्यास एकाच ठिकाणी एक मतदान करता येणार- जिल्हाधिकारी मित्तल

जालना । प्रतिनिधी

शहर महानगरपालिकेच्या आगामी ऐतिहासिक पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या (२०२५-२६) पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज विशेष पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाले की ज्या व्यक्तीचे मतदान यादीमध्ये दोन नावे असेल अशा व्यक्तीला एकाच ठिकाणी मतदान करता येईल तसेच दुसऱ्या दुसऱ्या नावावर फुलली मारण्यात येईल. तसेच महानगरपालिका निवडणूक मध्ये मतदारांनी जास्त जास्त मतदान करून मतदानाचा हक्क बजावे असेही आव्हान जिल्हाधिकारी यांनी मतदारांना केले आहे. या पत्रकार परिषदेत निवडणूक प्रक्रियेचे नियोजन, आचारसंहिता अंमलबजावणी आणि सुसंवादासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी या पत्रकार परिषद मध्ये



आयुक्तांचे मीडियाला आवाहन

यावेळी मार्गदर्शन करताना आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, ''जालना महानगरपालिकेची ही पहिलीच सार्वत्रिक निवडणूक असल्याने ती यशस्वीरीत्या पार पाडणे हे प्रशासनासमोर एक मोठे आव्हान आणि संधी आहे. या प्रक्रियेत प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, लोकशाहीचा हा उत्सव पारदर्शक आणि शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व माध्यम प्रतिनिधींनी प्रशासनाला सकारात्मक सहकार्य करावे.

जिल्हाधिकारी तथा महानगरपालिका चे आयुक्त आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे , महानगरपालिकाचे सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे त्यांचे उपस्थिती होती.पत्रकार परिषदेच्या प्रारंभी निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. केशव कानपुडे यांनी यांनी निवडणूक संदर्भात माहिती दिली. त्यांनी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी करण्यात आलेल्या प्राथमिक तयारीची माहिती दिली. महानगरपालिका प्रशासनाने सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या कार्यालयांची ठिकाणे निश्चित केली असून, उमेदवारांच्या सुलभतेसाठी या केंद्रांवर सर्व आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. निवडणुकीच्या काळात माहितीचा ओघ सुरळीत राखण्यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात स्वतंत्र 'जनसंपर्क अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. या सर्व अधिकाऱ्यांमधील समन्वय आणि अधिकृत माहितीचे संकलन जालना महानगरपालिकेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांकडे असेल, जिथे मीडिया प्रतिनिधींना सर्व अद्ययावत माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होईल. निवडणूक जाहीर होताच शहरात आदर्श आचारसंहितेची कडक अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत शहराच्या विविध भागांतील विद्रुपीकरण रोखण्यासाठी एकूण ५३८ अनधिकृत झेंडे, बॅनर आणि पोस्टर्स प्रशासनाकडून जप्त/काढून टाकण्यात आले आहेत. ही कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळांना १९ व २० डिसेंबरला सुट्टी

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे आदेश

अहिल्यानगर

जिल्ह्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर, ज्या शाळांमध्ये मतदान केंद्रे आहेत, अशा शाळांना शुक्रवार १९ डिसेंबर आणि शनिवार २० डिसेंबर २०२५ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमानुसार जिल्ह्यातील संगमनेर, शिर्डी, राहुरी, श्रीरामपूर, शेवगाव, जामखेड व श्रीगोंदा (राहाता वगळून) तसेच कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी या नगरपरिषदा आणि नेवासा नगरपंचायत या ठिकाणी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान पार पडणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी मतदानाच्या एक दिवस अगोदर, म्हणजेच १९ डिसेंबर रोजी केंद्रांवर पोहोचणार आहेत. त्यामुळे निवडणूक कामात अडथळा येऊ नये, यासाठी संबंधित शाळांना दोन दिवसांची सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या कालावधीत संबंधित मतदान केंद्रे (शाळांच्या इमारती) निवडणूक कामासाठी उपलब्ध राहतील तसेच तेथे पिण्याचे पाणी व वीज व्यवस्था सुरळीत राहील, याची दक्षता घेण्याचे निर्देश प्रशासनास देण्यात आले आहेत.

"शेतकरी हक्क मोर्चा" साठी मुळुकवाडी शेतकऱ्यांची वज्रमूठ

लिंबागणेश

बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश पंचक्रोशीतील मुळुकवाडी येथील शेतकऱ्यांनी आज शुक्रवार, दि. १९ रोजी बसस्थानक परिसरात एकत्र येत भावबाढीच्या ''शेतकरी हक्क मोर्चा'' साठी वज्रमूठ आवळली. सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या पुढाकाराने आयोजित बैठकीत शेतकरी पुत्र, शेतकरी व शेतकरी मित्रांनी दि. २५ डिसेंबर (गुरुवार) रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे निघणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा निर्धार केला.

बीड जिल्ह्यातील कोरडवाहू शेतकरी कापूस, सोयाबीन व तूर या प्रमुख पिकांना योग्य दर न

मिळाल्यामुळे तीव्र आर्थिक संकटात सापडला आहे. कापूस खरेदी केंद्रांवर सीसीआयकडून होणारी पिळवणूक तसेच सोयाबीन खरेदी केंद्रांवरील सरसकट अन्याय सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी यावेळी केला. या अन्यायाविरुद्ध शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व शेतकऱ्यांचा आवाज बुलंद करण्यासाठी मुळुकवाडी येथे शेतकरी जागृती अभियान अंतर्गत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस माजी सरपंच कृष्णा पितळे, पांडुरंग कानडे ,बंडु चेअरमन,भास्कर ढास, ऋषिकेश ढास, कृष्णा ढास, सुरज ढास, गहिनीनाथ ढास, विक्रम रंधवे, बाळासाहेब ढास, गोवर्धन ढास, भागवत कदम, दिलीप ढास, शिवाजी ढास , संदिपान ढास, लिंबाजी ढास,उत्तरेश्वर ढास,बाळु कोटुळे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साखर शाळा सुरु करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम

जालना। प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील सागर कारखाना परिसरातील ऊसतोड मजूर कामगारांच्या छावणीमध्ये गुरुवार दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी जिल्हा माहिला व बालविकास अधिकारी आर. व्ही. कड यांच्या मार्गदर्शनानूसार कायदेविषयक माहिती, बालकांचे अधिकार, बाल विवाह, चाईल्ड हेल्पलाईन १०९८, महिला हेल्पलाईन आणि शाळा बाह्य विद्यार्थ्यांना साखर शाळा सुरु करण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला.

जिल्हा महिला व बालविकास विभाग जालना आणि शिक्षण विभाग घनसावंगी यांच्या संयुक्त पथकाने पालक, बालकांना मार्गदर्शन केले. महिला व बाल विकास विभाग जालना कार्यालयातील जिल्हा बाल संरक्षण अधिकारी गजानन इंगळे, संतोष दाभाडे, वनिता पिंपळे, घनसावंगीचे शाम गोरे, अंबडचे संरक्षण अधिकारी मीनाक्षी शिंदे, वाहन चालक सुमेध मुंढे, शिक्षण विभाग घनसावंगीचे देवा चित्राल, केंद्र प्रमुख प्रकाश खराबे यांनी यांनी यावेळी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी अंगणवाडी कार्यकर्ती श्रीमती काळे यांनी कारखाना पर्यवेक्षक सुरेश कुडेकर यांच्यासह ऊसतोड मजूरांच्या पाल्यासह पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दिनांक १९/१२/२०२५

खोट्या आणि बदनामीकारक आरोपांचे उत्तर

डॉ. सामी फैसल बिनमाझी (डॉ. बेटु भैय्या) माझ्या प्रिय पुतण्याच्या अंतिम शवविच्छेदन (पोस्टमॉर्टम) अहवालात मृत्युचे कारण नैसर्गिक हृदयविकार असल्याचे वैद्यकीय दृष्टया सिध्द झाले आहे. पुतण्या आणि डॉ. सामी यांचे मोठे भाऊ सिरहान फैसल बिनमाझी यांनी माझ्या आणि माझ्या मुलाविरुध्द डॉ. सामी यांची हत्या केल्याचा केलेला आरोप वैद्यकिय दृष्टया निराधार आणि खोटा असल्याचे सिध्द झाले आहे. हा खोटा आरोप सिरहान फैसल बिनमाझी यांनी व्हॉटसअप सोशल मिडीयाच्या विविध ग्रुपवर पसरवला. त्यामुळे मला मानसिक त्रास झाला या निराधार आणि खोट्या आरोपामुळे कुटुंब आणि समाजात माझ्या प्रतिष्ठेला खूप नुकसान झाले.

स्वाक्षरित

तारेख मुबारक बिनमाझी

रा. अरबमोहल्ला, अंबड, ता. अंबड

जि. जालना

मो.९४२२२१६१७५

जगा आणि जगू द्या भ. महावीरांचे मुळ मंत्र - हस्तीमल बंब

१२० अनाथ व गरजुंना ठंडीचे कंबळ वितरण

जालना । प्रतिनिधी

स्वतःसाठी, आपल्या कुटुंबासाठी सर्व करतात, पण दिनदुःखी, अपंग, अनाथ, बेसहारा गरजुमंदासाठी मदत करणे जरुरतमंद आपल्या पर्यंत पोहचण्यापुर्वी त्यांच्या पर्यंत जाऊन त्यांना सहाय्य करणे हे महान कार्य आहे. जगा आणि जगु द्या भ. महावीरांचे मुळ मंत्र आहे. असे उद्गार महावीर इंटरनेशनलचे महाराष्ट्र व गुजरात राज्याचे विस्तार प्रमुख हस्तीमलजी बंब यांनी काढले. महावीर इंटरनेशनल जालना सेंटर रॉयल तर्फे दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी रेल्वे स्टेशन परिसरात अनाथ, गोर-गरीब, गरजुंना ठंडी पासून बचावासाठी १२० गरम कंबळ चे वितरण श्री बंब यांच्या हस्ते

करण्यात आले. पुढे बोलतांना बंब म्हणाले दान, धर्म, पुजा-पाठ, मंदिरात जे पुण्य मिळते या विधायक कामात सुध्दा त्यापेक्षा कमी पुण्य मिळणार नाही. मानव सेवा हिच ईश्वर सेवा आहे. महावीर इंटरनेशनल संपुर्ण देशात दिनदुःखी साठी मदत कार्य करत आहे. नुकतेच जालना शाखेला मानवीय सेवेच्या कार्य बद्दल राज्य स्तरीय पुरस्कार सुा मिळालेला आहे. संपुर्ण देशात महाराष्ट्र राज्याचे कार्य सर्वात अव्वल आहे. मागील वर्षात संपुर्ण राज्याचा दौरा करून अनेक शाखा उघडण्यात आले आहे, असे बंब म्हणाले. श्री सुराणा मनोगत व्यक्त करताना भ. महावीरांचे विचार जोपासणारे कोणत्याही धर्माचे व्यक्ती आमचे संस्थेचे सभासद होऊ शकतात. मागील ५० वर्षापासून महावीर इंटरनेशनल दिनदुःखी, गरजुंसाठी मदत कार्य करीत आहे. रेल्वे स्टेशन व त्या परिसरात अनाथ, गोर, गरीब, बेसहारा अनेक लोक ठंडीत रात्रभर बसुन काढतात. गरजुंना मदत करणे हेच संस्थेचे उद्देश्य आहे. या पुर्वी पाऊस भरपुर पडल्याने ठंडी सुध्दा भयंकर आहे. त्या उद्देशाने गरम कंबळ वाटप करण्यात येत आहे, असे सुराणा म्हणाले. या कार्यक्रमासाठी कचरुलाल पाटणी, अभय सेठिया, दीपक मोदी, प्रमोद जोशी, पवन सुराणा, मकरंद सावजी, नेमीचंद मुथ्था, सुभाष सोनवणे, अशोक दहातोंडे यांनी परिश्रम घेतले. आभार सचिव देवेन्द्र सावजी यांनी मांडले तर सुत्र संचालन पार्श्वनाथ अंबेकर यांनी केले.

दैनिक
राज्य लोकतंत्र
शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ | ६

परळीतील चार प्रभागामध्ये होणार आज मतदान

मतदानासाठी प्रभागातील मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा–अरविंद लाटकर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार परळी वैजनाथ नगरपरिषदच्या निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार उर्वरित नगर परिषदेच्या ३ प्रभागातील ४ नगर सेवकपदासाठी १९ उमेदवार रिंगणात आहेत. या जागासाठी शनिवार दि. २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. ४ जागेसाठी १४, २३८ मतदार मतदान हक्क बजावणार आहेत. दुबार मतदान असणाऱ्याना करता येणार एकाच ठिकाणी मतदान व हमीपत्र सादर करावं लागणार आहे. तर दुबार मतदान केल्यास कारवाई होणार आहे. तर प्रभागातील मतदान केंद्रावर सिसिटीव्ही निगरानी राहणार आहे. तरी आज होणाऱ्या मतदानासाठी उर्वरित प्रभागातील मतदार बांधवानी लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी

उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे व मतदान करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी केले आहे.

मा. राज्य निवडणूक आयोग यांचेकडील आदेश क्र. रानिआ/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का-६, दिनांक २९/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णयाविरोधात व्यथित उमेदवाराने जिल्हा न्यायालयात अपील दाखल करण्यात आलेले होते, अपीलाचा निकाल संबंधित जिल्हा न्यायालयाकडून दिनांक २२/११/२०२५ नंतर म्हणजेच दिनांक २३/११/२०२५ किंवा तद्नंतर देण्यात आलेला आहे अशा नगरपरिषद सदस्य पदांच्या त्या जागेवरील दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या कार्यक्रमानुसार घेण्यात येणारी निवडणूक स्थगित करून सुधारित निवडणूक कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे.त्यानुसार, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ यातील नियम ४ आणि ५ व इतर सर्व अनुषंगिक तरतुदीप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन , विवेक जॉन्सन (भा.प्र.से) जिल्हाधिकारी बीड या सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या संबंधित प्रभागातील जागेकरिता घेण्यात येणा-या सार्वत्रिक निवडणूकीच्या संबंधात पूढील नेमणुका व तारखा निश्चित करीत आहे. परळी वैजनाथ नगरपरिषदच्या निवडणुकीसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार आज मतदान होणार आहे.

बीड, अंबाजोगाई ,धारूर मध्येही आज मतदान

जिल्हा सह आयुक्त, नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी न्यायालयीन अपील दाखल झालेल्या सदस्य पदाच्या जागेवरील निवडणूक स्थगित करून संबंधित नगरपरिषदांमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम-२०२५ जाहीर करण्यात आलेला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सुधारीत निवडणूक कार्यक्रमानुसार खालील विवरणपत्रातील नगर परिषदांच्या प्रभागातील जागेकरीता दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यात बीड मधील १ अंबाजोगाईच्या ४ परळीच्या ४ तर किल्ले धारूर येथील एका जागेवर मतदान होणार आहे. बीड प्रभाग क्र. ३ जागा क्र. ३ ब, अंबाजोगाई प्रभाग क्र. १,३,६ आणि १० जागा क्र. १ब, ३अ, ६ अ आणि १० ब, परळी वैद्यनाथ प्रभाग क्र. ३,९,११, आणि १४ जागा क्र. ३ अ,३ब,९अ आणि १४ ब किल्ले धारूर प्रभाग क्र. १० जागा क्र. १० अ,

परळी वैजनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता दिनांक ०२.१२.२०२५ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली आहे. तर प्रभाग क्र. ०३ अ व ब, प्रभाग क्र. ९ अ व प्रभाग क्र. १४ ब करिता दिनांक २०.१२.२०२५ रोजी मतदान होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे, त्या ठिकाणी विविध निर्बंध लागू करण्यात आले आहेत. नगरपरिषद कार्यालय येथून मतदान साहित्य वाटप करण्यात आले. उर्वरित जागासाठी १५ मतदान केंद्रांसाठी लागणाऱ्या साहित्य वाटप करून पूर्णपणे सज्ज झाले आहेत. यामुळे मतदान दिवशी कोणतीही अडचण येऊ नये, याची विशेष खबरदारी प्रशासनाने घेतली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मार्गदर्शन, तसेच इतर अधिकाऱ्यांच्या कामकाज व नियोजनामुळे परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीतील उर्वरित जागासाठीच्या मतदानाची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे.

एसबीआय ग्राहक सेवा केंद्रात चोरी

शटरचे कुलूप तोडून १ लाख १४ हजार ३०० रुपये लंपास; सीसीटीव्हीत प्रकार कैद

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरातील हनुमान चौक, माणिकनगर परिसरात असलेल्या एसबीआय ग्राहक सेवा केंद्रात अज्ञात चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी दुकानाचे शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश करत तब्बल १ लाख १४ हजार ३०० रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे चोरीचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

ग्राहक सेवा केंद्राचे चालक वैभव रोडे यांनी दि. १८ डिसेंबर रोजी नेहमीप्रमाणे दिवसभर ग्राहक सेवा केंद्राचे कामकाज केले. दिवसभरात जमा झालेली १,१४,३०० रुपयांची रक्कम त्यांनी

दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवली होती. रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून ते घरी गेले.दरम्यान, मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी ग्राहक सेवा केंद्रासह शेजारील दुकानांचे शटर तोडले. सकाळी ग्राहक सेवा केंद्राच्या शेजारील दुकानदारांनी वैभव रोडे यांना फोन करून कळवले की, आमचे दुकान फोडले असून तुमचेही दुकान फोडलेले आहे. शटरला कुलूप दिसत नाही. ही माहिती मिळताच वैभव रोडे तातडीने दुकानात दाखल झाले असता, शटरचे कुलूप तुटलेले व दुकानातील टेबलच्या ड्रॉवरमधील सर्व रोख रक्कम चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

या चोरीप्रकरणी ग्राहक सेवा केंद्र चालक वैभव रोडे यांच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे. ◀◀ पान ३ वर

गंगाई-बाबाजी रौप्य महोत्सवाचे सिने अभिनेत्री हेमांगी कवी यांच्या हस्ते २९ डिसेंबर रोजी उद्घाटन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील शेतकरी शिक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघाचे माजी आ.भीमराव धोंडे यांच्या आई वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ भगवान महाविद्यालयाच्या वतीने आयोजित २५ व्या.गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाचे उद्घाटन सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी सकाळी १० वा.आष्टी येथील भगवान महाविद्यालयात सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी यांच्या हस्ते होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी माजी आ.भीमराव धोंडे हे राहणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी दिली.

आष्टी येथे संपन्न होणाऱ्या या गंगाई - बाबाजी रौप्य महोत्सवी कला महोत्सवाची जय्यत तयारी झाली आहे.आष्टी शहरात ठीकठिकाणी कार्यक्रमाचे भव्य फलक लावण्यात आले आहेत. भगवान महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य स्टेज उभारण्यात आले असून हजारो प्रेक्षकांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.दुचाकी व चार चाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे अशी माहिती संयोजन समितीने दिली. साहित्य,सामाजिक कार्य, जीवनगौरव,शिक्षण, पत्रकारिता, कला, क्रीडा, कृषी, अध्यात्म, शौर्य, प्राणी मित्र, आदर्श माता पिता,आदर्श अधिकारी, उद्योग,विधी वैद्यकीय सेवा आदि क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना गंगाई बाबाजी राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास आष्टी पंचक्रोशीतील कला, साहित्य,रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे, संस्थेचे संचालक डॉ.अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे,संयोजन समितीचे अध्यक्ष प्राचार्य दत्तात्रय वाघ,उपप्राचार्य प्रा.डॉ. ज्ञानदेव वैद्य,उपप्राचार्य प्रा.डॉ. आप्पासाहेब टाळके, प्राचार्य सुरेश बोडखे,प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमगर, मुख्याध्यापक संतोष थोरवे, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर राऊत, (मुख्याध्यापक),प्राचार्य डॉ.उमाकांत बनाळे,प्राचार्य एस.जी.निशिगंध, प्रा.डॉ. बाळासाहेब गावडे,प्रा.डॉ. दिगंबर पाटील,संयोजन समिती सदस्यांनी केले आहे.

शिक्षक कॉलनी धारूर येथे हरिनाम सप्ताह

किल्लेधारूर । प्रतिनिधी

ह भ प नारायण महाराज चिंचपूरकर यांच्या २४व्या पुण्यस्मरण निमित्त शिक्षक कॉलनी धारूर येथे अखंड हरिनाम सप्ताह महाभारत कथा याचे आयोजन २० डिसेंबर ते २७ डिसेंबर या दरम्यान करण्यात आले आहे याचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे

धारूर येथे शिक्षक कॉलनी आसरडोह रोड या ठिकाणी गेल्या २४ वर्षापासून ह भ प नारायण महाराज चिंचपूरकर यांच्या पुण्यस्मरणा निमित्त हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते याही वर्षी २० डिसेंबर ते २७ डिसेंबर या दरम्यान या अखंड हरिनाम सप्ताह, महाभारत कथा व कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे महाभारत कथेचे प्रवक्ते म्हणून ह भ प ज्ञानेश्वर माऊली लांब महाराज धारूरकर हे सांगणार आहेत तर या सोहळ्यात विविध मान्यवर महाराजांची कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये महंत पांडुरंग महाराज मुंडे रामनाचार्य उद्धव महाराज चोले महंत श्रीराम महाराज विडेकर, ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली लांब, महंत भगवान महाराज वरपगावकर, ह. भ. प. केशव महाराज घुले शास्त्री, ह. भ. प. प्रकाश महाराज साठे यांची कीर्तने होणार आहेत तर काल्याचे किर्तन व महाप्रसाद या दिवशी ह भ प आचार्य अर्जुन महाराज लाड यांचे कीर्तन होणार आहे या सोहळ्यात भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

आष्टीचे प्रसिद्ध कापड व्यापारी सोमनाथ पवार यांचा अपघाती मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

बिकट परिस्थितीशी संघर्ष करत यशस्वी उद्योजकापर्यंतचा प्रवास करणाऱ्या आष्टी शहरातील प्रसिद्ध एसपी कलेक्शन या नावाने सोमनाथ पवार यांनी व्यावसायाची अल्पावधीतच नावारुपाला आणून स्वकर्तृत्वावर कापड व्यवसाया मध्ये आपले स्थान निर्माण केले होते. लातूर या ठिकाणी दुकान मालाची ऑर्डर देण्यासाठी बुधवारी सकाळी जात असताना आंबेजोगाई शहराजवळ लोखंडी सावरगांव येथील कळब चौकामध्ये वळवावरती दुचाकी व टँकर च्या भीषण अपघातामध्ये दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. तरुण व्यावसायिकाची दुर्दैवी घटना घडल्याने आष्टी तालुक्यामध्ये हळहळ व्यक्त

केली जात आहे. त्यांच्या मृत्युने कापड व्यावसायिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. घटनास्थळावरून

मिळालेली अधिक माहिती अशी की आष्टी शहरातील एसपी मेन्स वेअर या कापड दुकान चे मालक सोमनाथ पवार हे आपल्या व्यवसायाच्या माल खरेदीसाठी ऑर्डर देण्यासाठी लातूर या ठिकाणी दुचाकी वरून बुधवारी दि. १७ डिसेंबर रोजी जात असताना आंबेजोगाई शहराजवळ लोखंडी सावरगाव येथील कळब चौकाच्या वळणावर टँकर क्रं. चक १६ उऊ १६१७ ने दुचाकी ला जोरदार धडक होऊन भिषण अपघात झाला अपघात एवढा भीषण होता की अपघातामध्ये दुचाकीस्वार कापड व्यावसायिक सोमनाथ ◀◀ पान ३ वर

बीड : बहुसोमयाजी यज्ञेश्वर महाराज सेलुकर यांच्या उपस्थितीत बीड येथील अमृत मंगल कार्यालयात दर्शेष्टि यज्ञाचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्त मंगळवारी आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक श्रीसूक्त हवन कार्यक्र मात शेकडो नागरिक सहभागी झाले होते. यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.

आ.प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा – सरपंच त्रिंबक साबळे

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघाचे भाग्य विधाते आमदार प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी जवळा(फ) चे सरपंच त्रिंबक साबळे यांनी केली आहे, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मंत्रिमंडळात यापूर्वी सहकार, मदत पुनर्वसन मंत्री म्हणुन काम केलेले आहे, जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते म्हणुन त्यांची ओळख आहे. मंत्री पदांच्या माध्यमातून त्यानी राज्यभरामध्ये कामाच्या माध्यमातून वेगळी ओळख निर्माण केली होती,

उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे निकटवर्तीय आहेत, पवार परिवाराचे विश्वासु म्हणुन आमदार प्रकाश सोळंके यांच्याकडे पाहिले जाते, विकासाची जाण असणारे विकासाभिमुख नेतृत्व आ. प्रकाश सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी सरपंच त्रिंबक साबळे यांनी केली आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा दिल्याने त्यांची जागा रिक्त झाली आहे, त्याजागी आ. प्रकाश सोळंके यांची वर्णी लागावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

बीड : जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सतीश कुमार सोळुंके यांचे बीड आय एम ए तर्फे स्वागत करताना प्रभारी जिल्हा शैल्यचिकित्सक डॉ संजय राऊत अध्यक्ष डॉक्टर अनंत मुळे सचिव डॉक्टर अमोल गिते डॉ संतोष शहाणे डॉ डोळे

खरीप पिकांची ई-पीक पाहणी नोंद न केलेल्या शेतकऱ्यांना मुदतवाढ

पाटोदा । प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२५ मध्ये विविध मुदतीत ई-पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला असून, शासन निर्णयानुसार अशा शेतकऱ्यांना पुन्हा संधी देण्यात येत आहे. याबाबत तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पाटोदा यांनी प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे.

दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी महसूल व वन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयानुसार खरीप हंगाम २०२५ मध्ये ई-पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांची नोंदणी ऑफलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे. संबंधित मंडळाचे मंडळ अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या ग्रामस्तरीय समितीमार्फत ही प्रक्रिया राबवली जाणार आहे.

ई-पीक पाहणी नोंद करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असून, शेतकऱ्यांनी ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे आवश्यक अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांनी पीक नोंदीसाठी स्वच्छ पाणी उपलब्धतेबाबत आवश्यक माहिती द्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. प्रथम स्तरावरील तपासणीनंतर दुसऱ्या स्तरावरील तपासणी तालुका पातळीवर करण्यात येणार असून, नमुना तपासणीद्वारे पात्र शेतकऱ्यांची निवड केली जाईल. मागील तीन वर्षांत पीक नोंद न झालेल्या शेतकऱ्यांनाही या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात येणार आहे. तहसीलदार पाटोदा यांनी तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, ज्यांनी खरीप हंगाम २०२५ मध्ये ई-पीक पाहणी ॲपवर नोंद केली नाही, त्यांनी तात्काळ आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी किंवा संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नोंद पूर्ण करावी.

कर्तव्यावर असताना तरुण पोलिस सुदाम पोकळे यांचा अपघाती मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील चिंचाळा गावचे सुपुत्र, तरुण पोलिस कर्मचारी सुदाम राजकुमार पोकळे यांचे कर्तव्य बजावत असताना दुर्दैवी अपघातात निधन झाले. गुरुवारी रात्री अहिल्यानगर जिल्ह्यातील राशीन चौकी परिसरात गस्त घालत असताना एका भरधाव वाहनाने धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. या अपघातात सुदाम पोकळे यांचा जागीच मृत्यू झाला.

सुदाम पोकळे हे शेतकरी कुटुंबातील असून कुटुंबाचा मुख्य आधार होते. त्यांच्या अकाली जाण्याने पोकळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण चिंचाळा गाव शोकसागरात बुडाले आहे.कर्तव्यनिष्ठ, प्रामाणिक, मनमिळाबू व सर्वांशी आपुलकीने वागणारा तरुण म्हणून सुदाम पोकळे यांची ओळख होती. समाजाच्या सुरक्षिततेसाठी अखेरच्या श्वासापर्यंत झटणाऱ्या या शूर पोलिस कर्मचाऱ्याने कर्तव्यावर असतानाच आपले प्राण अर्पण केले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच चिंचाळा गावासह आष्टी तालुक्यात शोककळा पसरली. अनेक नागरिक, सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शोकसंवेदना व्यक्त केल्या.सुदाम पोकळे हे यापूर्वी अंभोरा पोलीस स्टेशन येथे अनेक वर्षे कार्यरत होते. काही दिवसांपूर्वीच त्यांची कर्जत पोलीस स्टेशन येथे बदली झाली होती. नव्या ठिकाणी कर्तव्य बजावत असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दुपारी १२.३० वाजता चिंचाळा येथील त्यांच्या शेतात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलिस दलाच्या वतीने हवेत गोळ्या झाडून मानवंदना देण्यात आली. ◀◀ पान ३ वर

प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल वडवणी येथे लर्नर लीड कॉन्फरन्स माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते बक्षीस वितरण

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील संस्कार शिक्षण मंडळ वडवणी संचलित प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा वृत्ती वाढावी म्हणून संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांच्या संकल्पनेतून लर्नर लीड कॉन्फरन्स आयोजन सोमवार दि.१५ डिसेंबर २०२५ रोजी इंग्लिश स्कूलमध्ये करण्यात आले होते.

याबाबत अधिक माहिती अशी की,वडवणी शहरातील एकमेव इंग्लिश स्कूल जिथे प्रोपेल सिल्याबसच्या माध्यमातून एलईडी टी. व्ही.स्क्रीनचा उपयोग करून

अध्यापन केल जाते व सर्व महिला शिक्षिका कर्मचारी स्टाफ आहे विद्यार्थ्यांना योग्य प्लॅटफॉर्म उपलब्ध करून त्यांच्यामध्ये जिज्ञासा,तर्क,संशोधन करण्याची वृत्ती वाढावी म्हणून लर्नर लीड कॉन्फरन्स आयोजन इंग्लिश स्कूलमध्ये करण्यात आले होते यांचे उद्घाटन आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मधुकररावजी धस सर यांच्या हस्ते फीत कट करून करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपापले वैज्ञानिक मॉडल सादर केले त्यामधुन प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकास माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या हस्ते कलरपेटी बॉक्स,पल बॉक्स, वही, पेन,पाण्याची बॉटल इ.शैक्षणिक साहित्य बक्षीस देऊन गुणगौरव केला.याप्रसंगी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मधुकररावजी धस सर, डॉ.खोटे, युवा नेते श्रींमत मुंडे,मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे, संस्थेचे संचालक इंजि.अशोक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.२० डिसेंबर २०२५ । पान ७

शरद मोहोळ खून प्रकरणात मोठा ट्विस्ट

मास्टरमाइंड असल्याचा दावा केलेल्या आरोपीला सोडण्याचे कोर्टाचे आदेश, पुणे पोलिसांना दणका

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील गुन्हेगारी विश्वात काही वर्षांपूर्वी एका मोठ्या खूनाची घटना घडली होती. पुण्यातील गुंड शरद मोहोळ (डहरीरव चेहेश्र चीवशी ऊरीश) याचा गोळ्या घालून खून करण्यात आला होता, त्या खटल्यात मोठा ट्विस्ट आला आहे. यामुळे पोलीस तपासाला मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानला जाणारा विठ्ठल शेलार याला तातडीने मुक्त करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. पोलिसांकडून अटकेची प्रक्रिया राबवताना झालेल्या कायदेशीर त्रुटींमुळे न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.

गुंड शरद मोहोळ खून प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधार विठ्ठल शेलार याने पोलिसांनी केलेल्या बेकायदेशीर अटकेविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात 'हेबियस कॉर्पस रिट' याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेच्या सुनावणीनंतर न्यायालयाने ही अटक बेकायदेशीर ठरवत विठ्ठल शेलार याला मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत, शरद मोहोळचा ५ जानेवारीला २०२४ ला कोथरूडमधील सुतारदरा परिसरात भरदिवसा गोळ्या घालून खून करण्यात आला होता. या प्रकरणात विठ्ठल शेलार आणि गणेश मारणेसह एकूण १८ जणांविरोधात महाराष्ट्र गुन्हेगारी कायद्यानुसार (मकोका) संघटित नियंत्रण कारवाई करण्यात आली होती. त्यांच्याविरोधात पुण्यातील विशेष न्यायालयात १७५० पानांच्या दाखल केलेल्या आरोपपत्रामध्ये विठ्ठल शेलार आणि गणेश मारणे हे दोघे मोहोळच्या खुनामागचे मुख्य सूत्रधार असल्याचा दावा पोलिसांनी केला होता.

दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी अटक केल्यानंतर २४ तासांच्या आत न्यायालयासमोर हजर केले नसल्याचा दावा विठ्ठल शेलारने करत उच्च न्यायालयात 'हेबियस कॉर्पस रिट' याचिका दाखल केली होती. मोहोळच्या खुनानंतर दुसऱ्या दिवशी पहाटे पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शेलारला पनवेल येथून अटक केली होती. मात्र, त्याला तिसऱ्या दिवशी न्यायालयासमोर हजर करण्यात आलं होतं. आरोपीला अटक करताना त्याचा आधार व त्यामागची कारणेही दिली नव्हती. ही अटक बेकायदा असल्याचा युक्तिवाद विठ्ठल शेलारच्यावतीने वकिलांनी केला. तो ग्राह्य धरून न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने शेलारला सोडण्याचा आदेश दिले आहेत. एखाद्याला अटक केल्यास त्यास न्यायालयात हजर करून अटकेचे कारण व कायदेशीरता तपासली जाते. जर अटक बेकायदेशीर आढळली, तर न्यायालय त्या व्यक्तीची तत्काळ सुटका करण्याचा आदेश देते. ही याचिका नागरिकांना मनमानी आणि बेकायदेशीर अटकेपासून वाचवते आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करते. ही याचिका पोलिस, सरकारी अधिकारी किंवा खासगी व्यक्ती त्यांच्याविरुद्ध दाखल केली जाऊ शकते.

ओतूरमध्ये पोलिसांची धडक कारवाई! ५ दिवसांत ३.८७ लाखांचा ऐवज परत; आरोपीला अटक

ओतूर । प्रतिनिधी

ब्राह्मणवाडा रोडवरील संकल्प पॅराडाईजमध्ये झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्याचा यशस्वी तपास लावून पोलिसांनी सुमारे ३ लाख ८७ हजार २०० रुपये किमतीचा चोरीला गेलेला मुद्देमाल फिर्यादीला परत केला आहे. पोलिसांच्या या तत्पर कामगिरीबद्दल नागरिकांमधून मोठे कौतुक होत असून सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, येथील मंदाकिनी लक्ष्मण डुंबरे यांच्या रूम नं ३०२ मध्ये दिनांक १२ रोजी मध्यरात्री २ ते सकाळी ६ च्या दरम्यान चोरी झाली होती. फिर्यादी व त्यांचे पती झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने हॉलच्या खिडकीतून प्रवेश करून ३ तोळे ८ ग्रॅम वजनाचे मणी मंगळसूत्र, पोको कंपनीचा मोबाइल आणि पितळेची गायीची मूर्ती असा ऐवज लंपास केला होता.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस हवालदार बाळशिराम भवारी यांच्याकडे तपासाची चक्रे सोपवण्यात आली होती.पोलिसांनी या गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला असता, हा गुन्हा अक्षय दिलीप घाटवड (वय १९, सध्या रा. ओतूर, मूळ रा. माळेगाव पठार, ता. संगमनेर) याने केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपीला अटक केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि चोरीचा माल स्वतःच्या घरात लपवून ठेवल्याचे सांगितले.

पोलिसांनी आरोपीच्या घरातून ३ लाख ८० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र, १२०० रुपयांची पितळी मूर्ती आणि ६ हजार रुपयांचा मोबाइल असा एकूण ३ लाख ८७ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.जप्त केलेला हा सर्व ऐवज फिर्यादी मंदाकिनी डुंबरे यांना सन्मानपूर्वक परत करण्यात आला. ही कामगिरी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, जुन्नरचे उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाळशिराम भवारी, नरेंद्र गोराणे, देविदास खेडकर, विलास कोंढावळे आणि ज्योतीराम पवार यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

वाळवंटात बारामतीच्या युवकांची जिगर! बॉर्डर अल्ट्रा मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण

पुणे । प्रतिनिधी

अत्यंत आव्हानात्मक, खडतर व क्षमतेचा कस लावणारी राजस्थानमधील बॉर्डर अल्ट्रा मॅरेथॉन - द हेल रेस बारामतीच्या जिगरबाज तरुणांनी यशस्वीरीत्या पूर्ण केली.

जैसलमेर ते लोंगेवालाच्या दरम्यान दिवसा ऊन, संध्याकाळी वारा आणि रात्री शरीर गोठवणारी थंडी अशा वातावरणात येथील दादासाहेब सत्रे, बारामती सहकारी बँकेचे उपसरव्यवस्थापक प्रशांत शिर्के, केतनकुमार माने, राहूल शिर्के, राहूल चौधर, अनिस कोलंबोवाला, किशोर नलवडे व महेंद्र गोंडे यांनी ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. थरच्या वाळवंटात १०० किलोमीटर अंतराची ही स्पर्धा दरवर्षी आयोजित केली जाते. ही स्पर्धा जैसलमेर ते लोंगेवालाच्या दरम्यान शारीरिक व मानसिक क्षमतांचा कस लावणारी असते. ४ डिसेंबर १९७१ ला याच वाळवंटात जैसलमेर जवळच्या लोंगेवाला चौकीवर पराक्रमाची गाथा लिहिली गेली. पाकिस्तानच्या शेकडो रणगाड्यांनी लोंगेवाला चौकीवर हल्ला केला. भारताच्या शूर १२० जवानांनी पाकिस्तानच्या जवानांना चोख प्रत्युत्तर देत विजयी पताका फडकवली. धैर्य आणि बलिदानाने पावन झालेल्या या रणभूमिला सलाम करण्यासाठी या ऐतिहासिक संघर्षाची आठवण म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाते.

तेथील हवामान अतिशय प्रतिकूल असते. दिवसभर तेथे तीव ऊन तळपते. सायंकाळच्या सुमारास वारा आणि रात्री हाडे गोठवणारी थंडी असते. अशा विरोधाभासी वातावरणात टिकून राहत ही स्पर्धा पूर्ण करणे मोठे आव्हान असते. प्रत्येक दहा किलोमीटर अंतरानंतर हायड्रेशन पॉईंट उपलब्ध असतो. त्यामुळे आपले पाणी, खाण्याचे साहित्य हे स्पर्धकाला स्वतःजवळ बॅगेत ठेवून दहा किलोमीटर अंतर वजानासह पूर्ण करावे लागते. स्पर्धकांना कोणत्याही प्रकारे बाहेरील लोकांची मदत घेता येत नाही. अशी मदत घेतल्यास स्पर्धेतून त्या स्पर्धकाला बाद ठरवले जाते. या स्पर्धेमध्ये बारामतीच्या दादासाहेब सत्रे यांनी १० तास २५ मिनिटांत स्पर्धा पूर्ण करत संपूर्ण धावांकामध्ये चौथे स्थान मिळविले. केतनकुमार माने, प्रशांत शिर्के, राहूल शिर्के यांनी १२ तास ५५ मिनिटांमध्ये तर राहूल चौधर यांनी १४ तास ३४ मिनिटांत स्पर्धा पूर्ण केली. अनिस कोलंबोवाला, किशोर नलवडे व महेंद्र गोंडे यांनी ५० किलोमीटरची स्पर्धा ७ तास २१ मिनिटात पूर्ण केली.

भरधाव रिक्षाने घेतला बळी! कुरुळी गावच्या हद्दीत भीषण अपघात

चिंबळी । प्रतिनिधी

पुणे-नाशिक महामार्गावर एका भरधाव रिक्षाने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू झाला, तर एकजण जखमी झाला आहे. ही घटना मंगळवारी (१६ डिसेंबर) रात्री पुणे-नाशिक हायवेवरील कुरुळी गावच्या हद्दीत स्पायसर चौक येथे घडली.या अपघातात संदीप जगरनाथ गुप्ता (वय २७) याचा मृत्यू झाला आहे.

याबाबत मोहम्मद हानिफ खालिद (३४, नाणकरवाडी, चाकण; मूळ रा. देवरिया, उत्तर प्रदेश) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात रिक्षा चालकावर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी आणि त्यांचा मित्र संदीप गुप्ता कंपनीतून सुट्टी झाल्यानंतर दुचाकीवरून घरी जात होते. स्पायसर चौकात सिग्नल जवळ पाठीमागून येणाऱ्या रिक्षाने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. या अपघातात संदीप गुप्ता याचा मृत्यू झाला, तर फिर्यादीच्या पायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाली. दक्षिण महाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

दुचाकी अडवून कुटुंबाला बेदम मारहाण; चौघांवर गुन्हा

थेऊर । प्रतिनिधी

थेऊर - कोलवडी रस्त्यावरून घरी जात असताना दुचाकी रस्त्यात अडवून एकाच कुटुंबातील चार जणांना शिवीगाळ करून लाकडी बैटने पट्टी व दगडाने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या मारहाणीत एक महिला गंभीर जखमी झाली आहे.ही घटना थेऊर (ता. हवेली) हद्दीतील श्री चिंतामणी विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय शाळेच्या मेनगेट समोर मंगळवारी (दि. १६) रात्री ८ ते १० वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

लोणी काळभोर पोलीस ठाण्यात बकासुरासह चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तनिष्का गणेश नायक (वय १९, नोकरी रा. घावटेवस्ती, नम्रता कॉलगी, साई विश्व सोसायटी, प्लॅट नंबर २०३, मांजरी बुद्रुक) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. तर अक्षय धनाजी सोनवणे, प्रसाद धनाजी सोनवणे, सविता धनाजी सोनवणे (रा. थेऊर) व बकासूर (पूर्ण नाव पत्ता माहिती नाही) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या महिरीनुसार, फिर्यादी तनिष्का नायक व त्यांचे पती गणेश, सासु अंबीका, सासरे दिलीप नायक व नणंद लक्ष्मी हे सर्वजण मांजरी बुद्रुक (ता. हवेली) येथील घरी मोटार सायकलवरुन चालले होते. तेव्हा थेऊर कोलवडी रस्त्यावरून जात असताना, त्यांच्या दुचाक्या श्री चिंतामणी शाळेच्या मेनगेट जवळ आल्या. तेव्हा पाठीमागुन अचानक अक्षय धनाजी सोनवणे, प्रसाद धनाजी सोनवणे व बकासुर तेथे आले. त्यांनी दुचाक्या अडवल्या. आणि शिवीगाळ करण्यास सुरवात केली. दरम्यान, अक्षय सोनवणे व प्रसाद सोनवणे यांनी लाकडी बैटने, पट्टीने फिर्यादी तनिष्का, अंबीका नायक व नंणद लक्ष्मी सोनवणे यांना मारहाण केली. तर बकासुर याने तेथे रोडच्या कडेला पडलेला दगड हातात घेऊन फिर्यादी तनिष्का नायक यांना मारला. तनिष्का नायक यांच्या कपाळला दगड लागल्याने त्या जखमी झाल्या. त्यानंतर आरोपींनी अंबीका नायक व लक्ष्मी सोनवणे हाताने मारहाण करुन शिवीगाळ केली.

शिरूरमध्ये राष्ट्रगौरव शौर्य पुरस्कार सोहळा उत्साहात; हंबीरराव मोहिते व महाराणी ताराबाईंच्या शौर्याचा जागर

शिरूर । प्रतिनिधी

सरसेनापती हंबीरराव मोहिते राष्ट्रीय प्रतिष्ठान, पुणे आणि रामलिंग महिला उन्नती बहुउद्देशीय सामाजिक संस्था, रामलिंग (ता. शिरूर) यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदवी स्वराज्याचे पराक्रमी सेनापती सरसेनापती हंबीरराव मोहिते तसेच स्वराज्य सौदामिनी छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित ऐतिहासिक राष्ट्रगौरव शौर्य पुरस्कार सोहळा शिरूर शहरात उत्साहात पार पडला.

शिरूर शहरातील बाबुरावनगर परिसरातील ज्ञानगंगा विश्व विद्यालयात झालेल्या या भव्य कार्यक्रमास इतिहासप्रेमी नागरिक, महिला, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. स्वराज्याच्या इतिहासातील शौर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचे स्मरण करून देणारा हा सोहळा ठरला. कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्यात्या अर्चना भोर यांनी हंबीरराव मोहिते यांची कन्या मी ताराराणी बोलते या विषयावर प्रभावी व अभ्यासपूर्ण व्याख्यान सादर केले. त्यांच्या व्याख्यानातून छत्रपती महाराणी ताराबाई यांचे शौर्य, नेतृत्वगुण, राजकीय दूरदृष्टी आणि स्वराज्य रक्षणातील मोलाचे योगदान प्रभावीपणे उलगडले. उपस्थित श्रोते या व्याख्यानाने मंत्रमुग्ध झाले. या प्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना राष्ट्रगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रा. डॉ. राजेराम प्रभू घावटे यांना राष्ट्रीय उद्योगरत्न पुरस्कार, अर्चना भोर यांना आदर्श महिला व्याख्यात्या पुरस्कार, निलेश काळे यांना राष्ट्रीय सोशल मीडिया इन्फ्लुएंसर पुरस्कार, डॉ. सुनीता पोटे यांना राष्ट्रीय आरोग्य दूत पुरस्कार, संजयराव शितोळे यांना शिक्षण महर्षी राष्ट्रगौरव पुरस्कार, तृप्ती सरोदे यांना आदर्श समाजसेविका पुरस्कार तर भाऊसाहेब दहिफळे यांना तालुकास्तरीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राजेंद्र ऊर्फ संग्रामसिंह मोहिते पाटील (अध्यक्ष, सरसेनापती हंबीरराव मोहिते राष्ट्रीय प्रतिष्ठान, पुणे), कुणालदादा मालुसरे (वंशज सुभेदार तानाजी मालुसरे), दीपकराजे शिर्के (वंशज महाराणी येसूबाई), अमितदादा गाडे (दूधमाता धाराऊ यांचे वंशज), सचिन दादा भोसले पाटील (नागपूरकर), महेंद्रजी नवले (गावगाडा इतिहास अभ्यासक) यांच्यासह सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज शुभम, आदित्य व सचिन मोहिते, सुप्रसिद्ध शिव व्याख्याते खालीलभाई शेख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अश्विनी उर्फ राणीताई कर्डीले यांनी केले. सूत्रसंचालन रावसाहेब चक्रे यांनी तर समारोपप्रसंगी शामकांत वर्पे यांनी आभार मानले. यावेळी शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप केंजळे, पत्रकार तेजस फडके (दैनिक प्रभात), ॲड. बाबुशेठ मोरे, अजय गायकवाड, बच्चूभाऊ गव्हाणे (राष्ट्रवादी शरद पवार गट - शिरूर तालुका युवा अध्यक्ष) आदींचीही उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना राजेंद्र ऊर्फ संग्रामसिंह मोहिते पाटील म्हणाले, सरसेनापती हंबीरराव मोहिते आणि महाराणी ताराबाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त दिले जाणारे पुरस्कार चार भिंतींच्या सभागृहात मर्यादित न ठेवता हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महाविद्यालयात घेण्यामागील उद्देश एवढाच आहे की या थोर व्यक्तिमत्त्वांचे संस्कार सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या मनात खोलवर रुजावेत. या पुरस्कारांमुळे इतिहास नव्या पिढीचा मार्गदर्शक ठरेल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. अशा उपक्रमांमुळे नव्या पिढीत इतिहासाबद्दल जागृती निर्माण होत असून राष्ट्रप्रेम आणि मूल्यांची जपणूक होत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

वाघोलीत कोयत्याने वाहनांची तोडफोड करून दहशत माजवणाऱ्यांना अटक

वाघोली । प्रतिनिधी

वाघोलीत वाहनांची तोडफोड करून नुकसान करीत, रस्त्यावरील दुकानांचे सीसीटीव्ही कॅमेरे कोयत्याने तोडून दहशत पसरविणाऱ्या वाघोलीतील पाच पैकी चार अल्पवयीन मुलांना गुन्हे शाखा युनिट ६ च्या पोलिसांनी ताब्यात घेतले असून आणखी एका तरुणाचा शोध पोलीस घेत आहेत. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाघोली येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या पाठीमागे, वाघोली-लोहगाव रोडवर गावठाण परिसरात त्याचप्रमाणे गणेशनगर येथील उद्यानाजवळील वाहनांची तोडफोड करून नुकसान करून दुकानांचे सीसीटीव्ही कोयत्याने तोडून दहशत पसरवित असल्याचा प्रकार बुधवारी (दि.१७) मध्यरात्री दीडच्या घडला होता. सदरचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होऊन संबंधित व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाल्याने एकच खळबळ उडाली होती. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन तरुणांचा शोध घेण्यास सुरुवात केली. पाच पैकी चौघांना गुन्हे शाखा युनिट सहाच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. चौघेही अल्पवयीन असल्याचे तपासात पुढे आले आहे. आणखी एकजण फरार झाला असून त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

दिव्यांग प्रमाणपत्राचा गैरवापर शिक्षकांच्या अंगलट!

४६ पैकी ३८ जण अडकले जाळ्यात

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्हा परिषदेत दिव्यांग प्रमाणपत्राचा गैरवापर करून बदलीचा लाभ घेणाऱ्या शिक्षकांचे बिंग अखेर फुटले आहे. चौकशीसाठी नोटीस बजावण्यात आलेल्या ४६ शिक्षकांपैकी ३८ शिक्षकांनी आपण बदलीसाठी या प्रमाणपत्राचा लाभ घेतल्याची कबुली दिली आहे. या सर्व शिक्षकांची बदली केली जाणार असून, त्यांच्यावर विभागीय चौकशीची प्रक्रियाही लवकरच सुरू होणार आहे.

जिल्ह्यातील ४०० हून अधिक शिक्षकांनी दिव्यांग प्रमाणपत्राचा लाभ घेतल्याच्या तक्रारी दिव्यांग संघटनांनी केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी १७६ शिक्षकांच्या प्रमाणपत्रांची आरोग्य उपसंचालकांमार्फत पडताळणी केली. या पडताळणीत संबंधित शिक्षकांचे अपंगत्व ४० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर जिल्हा परिषदेने ४६ शिक्षकांना नोटीस बजावून खुलासे मागवले होते. प्राप्त झालेल्या ४५ खुलाशांपैकी ३८ शिक्षकांनी बदलीसाठी या सवलतीचा वापर केल्याचे मान्य केले आहे, तर ४ शिक्षकांनी नियुक्तीपासूनच याचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. दुर्दैवाने या प्रक्रियेदरम्यान पुरंदरमधील एका शिक्षकाचा मृत्यू झाला आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे म्हणाले, ज्या ३८ शिक्षकांनी बदलीसाठी दिव्यांग प्रमाणपत्राचा लाभ घेतल्याचे सिद्ध झाले आहे. त्यांची तत्काळ बदली करण्यात येईल. तसेच, या सर्व शिक्षकांविरोधात कडक विभागीय चौकशी केली जाणार आहे.

ससून रुग्णालयात डॉक्टरांनाच गंडा!

१५ वर्षांच्या गर्भवती मुलीचं वय लपवण्यासाठी केला बनाव

पुणे । प्रतिनिधी

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून ती गर्भवती झाल्यानंतर ससून रुग्णालयात तिची प्रसूती करण्यात आली. नागपूर महापालिकेचा बनावट जन्मदाखला सादर करून वयाबाबत पोलीस आणि डॉक्टरांची दिशाभूल करण्यात आली. या प्रकरणात मुलींवर अत्याचार केल्याप्रकरणी एका तरुणासह महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत एका पोलीस कर्मचाऱ्याने काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या २५ वर्षीय तरुणाचे एका १५ वर्षीय मुलीशी प्रेमसंबंध होते. मुलगी अल्पवयीन असताना त्याने तिच्यावर अत्याचार केले. अत्याचार केल्यानंतर मुलगी गर्भवती राहिली. मुलगी सज्ञान असल्याचा बनावट दाखला आरोपींनी तयार केला. नागपूर महापालिकेच्या नावे तयार केलेला बनावट जन्मदाखला मुलीची आई आणि आरोपी तरुणाने ससून रुग्णलयात सादर केला. त्यानंतर मुलगी प्रसूत झाली. आरोपींविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो), पोलीस आणि डॉक्टरांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करीत आहेत.

सुलतानपूरमध्ये पहाटे थरार! घोडनदीच्या काठी अखेर बिबट्या जेरबंद; ग्रामस्थांनी टाकला सुटकेचा निःश्वास

आंबेगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सुलतानपूर येथे घोडनदीच्या काठालगत लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात सुमारे पाच वर्षे वयाची बिबट्याची मादी पकडण्यात वन विभागाला गुरुवार, दि. १८ रोजी पहाटे यश आले आहे.गेल्या काही दिवसांपासून या परिसरात बिबट्याचा मोठ्या प्रमाणावर वावर दिसून येत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते.

अखेर स्थानिक पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर वन विभागाने या ठिकाणी पिंजरा लावला होता. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सुनील वाघ, सामाजिक कार्यकर्ते संजय शिंदे आणि रोहिदास सूर्यवंशी यांनी बिबट्याच्या वाढत्या वावराबाबत वारंवार वन विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यांच्या मागणीची दखल घेत मंचर वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी घोड नदीच्या बाजूला पिंजरा लावण्यात आला होता. पिंजऱ्यात कोंबड्या आमिष म्हणून ठेवण्यात आल्यामुळे संबंधित बिबट्याची मादी त्यात अडकली. बिबट्या पकडल्याची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि सुरक्षितपणे बिबट्याला ताब्यात घेतले. या कारवाईमुळे सुलतानपूरसह परिसरातील ग्रामस्थांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, या भागात अजूनही दोन ते तीन बिबट्या असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुन्हा एकदा या परिसरात पिंजरा लावण्यात यावा, अशी मागणी आंबेगाव तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष निखिल हरिचंद्र गाडे पाटील यांनी केली आहे. वन विभागाने सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी.अशी अपेक्षा ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.